पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी



नितीन नबीन यांनी घेतले सिद्धीविनायकाचे दर्शन

मुंबई • वर्ष: 8 • अंक: 18 • 16 सप्टेंबर 2026 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.



# सेवा, समर्पण, राष्ट्रनिर्माण



अध्यक्षीय मनोगत

# सेवा, संकल्प अभियान

आपल्या सर्वांचे नेते विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त तसेच राज्यकर्ता म्हणून त्यांच्या कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने भारतीय जनता पार्टीतर्फे देशभर सेवा, संकल्प अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ऑक्टोबर २००१ रोजी मोदीजींनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली. गुजरातमध्ये झालेल्या प्रलयकारी भूकंपाच्या पार्श्वभूमीवर पक्ष नेतृत्वाने मोदीजींना मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारण्यास सांगितले. तेव्हापासून आजपर्यंत मोदीजींनी एक दिवसाची सुट्टी न घेता देशासाठी स्वत:ला समर्पित केले आहे. अशा या नेत्याच्या वाढदिवसानिमित्त आपण पुन्हा देशातील जनतेपर्यंत पोहचणार आहोत आणि नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या विकास यात्रेची माहिती देणार आहोत. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षात केलेल्या प्रगतीची माहिती टप्प्या-टप्प्याने 'मनोगत'मध्ये मागील दोन अंकापासून देण्यात येत आहे. मोदी सरकारच्या विकास यात्रेतील अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे अलिकडेच सुरू झालेला रेल्वेचा स्वतंत्र मालवाहतूक मार्गिका प्रकल्प. या प्रकल्पामुळे देशाच्या मालवाहतूक क्षेत्रात क्रांती होणार आहे. या प्रकल्पाची सविस्तर माहिती या अंकात देण्यात आली आहे. गेल्या १२ वर्षात देशाने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती अनुभवली. 'यूपीआय'सारख्या प्रणालीमुळे सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनात मोठा बदल घडून आला. या १२ वर्षात देशाने 'कोविड'सारख्या संकटाचा समर्थपणे सामना केला. कोविड लसीकरणासाठी मोदी सरकारने को-विन हे ॲप सुरू करून लसीकरणाची मोहीम यशस्वीपणे राबवली. भारतासारख्या देशात लसीकरण होणे अशक्य आहे, असे पाश्चिमात्य जगातील विचारवंत म्हणत होते. मात्र मोदीजींनी लसीकरणाचे शिवधनुष्य लीलया पेलले. कोठेही गोंधळ न होता भारतात लसीकरणाची मोहीम शांततेत पार पडली. अलिकडेच देशाने अमेरिका-इराण युद्धावेळी अशाच मोठ्या संकटाला तोंड दिले. या युद्धामुळे घरगुती गॅस, पेट्रोल, डिझेल या इंधनाची पुरवठा साखळी विस्कळीत झाली होती. गॅस, पेट्रोल, डिझेलच्या भावात प्रचंड भाववाढ होण्याची भीती या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत होते. मात्र मोदी सरकारने राजनैतिक मुत्सद्देगिरी पणाला लावत इंधन टंचाईची झळ देशाला बसू दिली नाही. घरगुती गॅस टंचाईच्या, पेट्रोल-डिझेल टंचाईच्या खोट्या बातम्या पसरवून देशात अशांतता पसवण्याचा प्रयत्न 'दिमागी नक्षलींनी' केला होता. मात्र त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला. जगातील अनेक देशांमध्ये गॅस, पेट्रोल, डिझेलचे भाव युद्धानंतर मोठ्या प्रमाणात वाढले होते. भारतात एका मर्यादेच्या पलीकडे इंधनाचे भावही वाढले नाहीत. पाकिस्तानच्या पाठिंब्यावर भारतात हिंसाचार करणाऱ्या दहशतवादी शक्तींचा मोदी सरकारने कसा बंदोबस्त केला, हेही देशाने अनुभवले आहे. पाकिस्तानी दहशतवाद्यांबरोबरच देशातील नक्षलवाद्यांचाही मोदी सरकारने बीमोड केला आहे. अशा या लोकोत्तर नेत्याच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी आपल्याला मिळते आहे, हे आपले भाग्यच आहे. सेवा, संकल्प अभियानाच्या माध्यमातून आपण अनेक उपक्रम राबवणार आहोत. हे अभियान आपल्या संघटनेसाठी अत्यंत महत्वाचे आहे. या अभियानातील सर्व कार्यक्रम आपण यशस्वीपणे पार पाडाल, याची खात्री आहे. संघटना विस्ताराचा आणखी एक टप्पा आपण अभियानाच्या माध्यमातून गाठणार आहोत.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश नामदेव हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

तरुणाईवर राज्य मोदींचेच ०४


स्पर्धा परीक्षांसाठी मोदी सरकारकडून 'मोफत ऑनलाईन कोचिंग' ०६



'या सम हा' ०८


एकात्म मानवतावाद व अंत्योदयाचे प्रणेते पंडीत दीनदयाल उपाध्याय १२


10 वर्षांत झोपडपट्टीमुक्त मुंबई १५


सामान्य ग्राहकाला UPI चे शुल्क द्यावे लागणार नाही १९


हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद नारायण कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश नामदेव हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# तरुणाईवर राज्य मोदींचेच




दिल्लीत जंतर-मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी यांना टीकेचे लक्ष्य करण्याची स्पर्धाच विचारवंत, पत्रकारांमध्ये लागली होती. देशभरातील तरुण वर्ग, विद्यार्थी वर्ग मोदी सरकारवर प्रचंड नाराज आहे, असे विश्लेषण या विचारवंतांकडून केले जात होते.

**मात्र** देशातील तरुणाई, विद्यार्थी वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अजूनही पूर्वीप्रमाणेच भरभरून प्रेम करतो आहे, हे अलिकडील दोन कार्यक्रमांमध्ये ठळकपणे दिसून आले. यापैकी एक कार्यक्रम ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत झाला. तर दुसरा कार्यक्रम ८ सप्टेंबर रोजी वडोदरा येथे झाला. या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणांमधून भारताच्या विकासाचे चित्र मांडले. पंतप्रधानांनी तरुणाईला देशाच्या विकास यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले. पंतप्रधानांच्या भाषणाला टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने प्रतिसाद देणारी तरुणाई पाहिल्यावर मोदी विरोधकांच्या छातीत धडकी भरली असेल. जंतर-मंतर आंदोलनानंतर भाजपा विरोधकांना आणि मोदी द्वेष्ट्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. मात्र या दोन्ही कार्यक्रमातून तरुणाई आणि विद्यार्थी वर्गाची नाळ अजूनही नरेंद्र मोदी यांच्याशी जोडलेली असल्याचे सिद्ध झाले.

नवी दिल्लीतील श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स या प्रख्यात महाविद्यालयाच्या शताब्दी महोत्सवात बोलताना पंतप्रधान मोदी यांनी पाऊण तास भाषण केले. या पाऊण तासाच्या भाषणात उपस्थित विद्यार्थ्यांनी ४१ वेळा टाळ्यांच्या कडकडाटाने पंतप्रधान मोदींना दाद दिली. पंतप्रधानांच्या भाषणाने त्या कार्यक्रमात उपस्थित प्रत्येकजण भारावलेला होता. तरुण वर्ग आणि विद्यार्थी हे



देशातील युवा वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा असल्याचे चित्र अनेक कार्यक्रमात दिसते.

## अर्थव्यवस्था वेगाने वाढते आहे

**सतत टीका करणाऱ्यांना ठोस आर्थिक आकडेवारीच्या आधारे प्रत्युत्तर देताना पंतप्रधानांनी सांगितले की, एप्रिल ते जून या कालावधीत देशातील वीज उत्पादनात ९ टक्क्यांची वाढ झाली आहे. त्याचबरोबर एकूण वाहन विक्रीत २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली असून, दुचाकी वाहनांच्या विक्रीत २० टक्के, तर तीनचाकी वाहनांच्या विक्रीत जवळपास ३० टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. पोलाद आणि सिमेंटच्या वापरात झालेली ८ टक्क्यांची वाढ ही देशातील बांधकाम, गृहनिर्माण आणि व्यावसायिक क्षेत्रातील गतिविधी वेगाने विस्तारत असल्याचे स्पष्ट प्रमाण असल्याचे त्यांनी सांगितले. तरीही २०१३ मध्ये ज्यांना प्रत्येक गोष्टीत अर्धा रिकामा ग्लासच दिसत होता, त्यांची मानसिकता आजही तशीच कायम आहे, असे पंतप्रधान श्री. मोदी यांनी नमूद केले.**

पंतप्रधान मोदींपासून दूर गेले आहेत, हा 'दिमागी नक्षलीं'चा खोटा प्रचार श्री राम कॉलेजच्या कार्यक्रमात उघडा पडला. पंतप्रधान मोदींचे हे भाषण अनेक अर्थांने वैशिष्ट्यपूर्ण होते. गेल्या १२ वर्षातील देशाच्या विकासाचे प्रगती पुस्तक पंतप्रधानांनी तरुणाई समोर सादर केले. गेल्या १२ वर्षात देशाची वाढलेली कृषी निर्यात, मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून देशाचा झालेला उदय याचा तपशील सादर करताना पंतप्रधानांनी भारताचे स्वत:चे अंतराळ स्थानक (स्पेस स्टेशन) उभारण्याचा संकल्पही बोलून दाखवला. तरुणाईने मोठी स्वप्ने पाहावीत आणि ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावावे, हा पंतप्रधानांचा संदेश उपस्थित तरुणांना वेगळीच ऊर्जा प्रदान करणारा ठरला.

श्री राम कॉलेज हे महाविद्यालय देशातील प्रतिष्ठित महाविद्यालयांपैकी आहे. या महाविद्यालयात शिक्षण घेण्याचे स्वप्न बाळगून हजारो विद्यार्थी दिल्लीत येत असतात. अशा अत्यंत प्रतिभावान, गुणवान विद्यार्थी पिढीशी पंतप्रधान मोदींनी साधलेला संवाद मोदी विरोधकांना अनेक संदेश देणारा ठरला. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींची देहबोली विलक्षण आत्मविश्वासाची होती. त्यांनी आपल्या भाषणातून भारत आता थांबणार नाही, कोणत्याच शक्तींच्या प्रचारापुढे झुकणार नाही, असा स्पष्ट संदेश दिला.

जेन-झीवर अजूनही मोदींचेच राज्य आहे, हे दर्शविणारा आणखी एक कार्यक्रम वडोदरा येथे झाला. याच दिवशी मुंबई बीकेसी येथे ग्लोबल फिनटेक फेस्ट या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी अर्थ, बँकिंग, माहिती-तंत्रज्ञान या क्षेत्रातील नामवंतांशी संवाद साधला. फिनटेक क्षेत्राने 'यूपीआय'चा जगभर विस्तार करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावावी, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी या कार्यक्रमात केले. या तिन्ही कार्यक्रमात पंतप्रधानांनी देशाच्या विकासाचे संकल्प चित्र मांडताना यात तरुणाईच्या सहभागाचे महत्वही अधोरेखित केले. ■

# स्पर्धा परीक्षांसाठी मोदी सरकारकडून 'मोफत ऑनलाईन कोचिंग'

## गरीब, मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारा फायदा




**देशातील** गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील होतकरू विद्यार्थ्यांचे डॉक्टर, इंजिनिअर आणि सनदी अधिकारी होण्याचे स्वप्न आता पैशांअभावी अपूर्ण राहणार नाही. 'आयआयटी-जेईई', 'नीट' आणि 'यूपीएससी' यांसारख्या कठीण स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी केंद्र सरकार लवकरच देशव्यापी 'मोफत ऑनलाईन कोचिंग' योजना सुरू करणार असल्याची महत्त्वाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. नवी दिल्लीतील शैक्षणिक परिषदेत संवाद साधताना पंतप्रधानांनी या महत्त्वाकांक्षी योजनेचे सूतोवाच केले. शिक्षणाचे व्यापारीकरण रोखणे आणि देशातील शेवटच्या घटकांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवणे, हे आमच्या सरकारचे ध्येय आहे. पैशांच्या कमतरतेमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाया जाणार नाही. असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. देशातील सर्वोत्तम शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ आता थेट ग्रामीण आणि दुर्गम भागातील सामान्य विद्यार्थ्यांनाही घरबसल्या पूर्णपणे मोफत घेता येणार आहे. सध्याच्या काळात वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांच्या कोचिंगचे शुल्क लाखो रुपयांच्या घरात गेले आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेले हुशार विद्यार्थी गुणवत्ता असूनही मागे पडतात, तर अनेक पालकांना हे शुल्क भरण्यासाठी कर्जबाजारी व्हावे लागते.

### आवश्यक पात्रता

योजना प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी असून विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. 'आयआयटी' आणि 'नीट' साठी अकरावी व बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थी, तर 'यूपीएससी' साठी पदवीच्या अंतिम वर्षात असलेले किंवा पदवीधर तरुण विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. नोंदणीसाठी आधारकार्ड, शैक्षणिक गुणपत्रिका आणि पालकांचा - उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे.

### कोणकोणत्या प्रादेशिक भाषांमध्ये कोचिंग ?

नवीन शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून हे कोचिंग केवळ इंग्रजी किंवा हिंदीपुरते मर्यादित न ठेवता, मराठीसह देशातील एकूण १२ ते १५ प्रमुख प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून दिले जाईल. व्हिडिओ लेक्चर्ससोबतच सराव प्रश्नपत्रिका (नोट्स आणि ई-बुक्सही) मराठीत विनामूल्य डाऊनलोड करता येतील. केंद्र सरकारच्या 'भाषिणी' कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीद्वारे देशातील सर्वोत्तम शिक्षकांचे इंग्रजीतील संवाद विद्यार्थ्यांना मराठी ऑडिओ आणि सब-टायटल्ससह रिअल टाईममध्ये पाहता येतील.

### ऑनलाईन नोंदणी कधीपासून ?

### केंद्र सरकारच्या शिक्षण आणि तंत्रज्ञान

मंत्रालयाकडून सध्या या राष्ट्रीय स्तरावरील डिजिटल प्लॅटफॉर्मची निर्मिती केली जात आहे. या प्रकल्पाच्या पूर्वतयारीनंतर, आगामी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला, म्हणजेच मार्च किंवा एप्रिल २०२७ पासून अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू होण्याची दाट शक्यता आहे. ■







नवी दिल्ली येथे श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयाच्या शताब्दी महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुण, विद्यार्थी वर्गाशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, दिल्ली विद्यापीठ कुलगुरु प्रा. योगेश सिंह, अजय श्रीराम, ज्येष्ठ पत्रकार रजत शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'या सम हा'

● डॉ. कांताताई नलावडे

> १७ सप्टेंबरला नरेंद्र मोदी यांचा ७६ वा वाढदिवस व ७ ऑक्टोबरला त्यांच्या राज्यकर्ता पदावरील कारकीर्दिला २५ वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने देशभर १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान सेवासंकल्प अभियान राबविले जाणार आहे. सेवा हाच संकल्प, समर्पण हीच ओळख, जनसेवेचा २५ वर्षाचा प्रवास म्हणजे त्याग, तपस्या, आणि राष्ट्रसेवेच्या अतूट संकल्पाची गौरवगाथा आहे.



**गुजरात** मॉडेल साकारणारे मुख्यमंत्री ते देशाचे यशस्वी पंतप्रधान असा मूल्यवर्धित प्रवास असणारे पंतप्रधान! गेल्या १२ वर्षात भारत संपूर्ण डिजीटल परिवर्तनाच्या पातळी पोहोचला आहे. कोविन ॲप विकसित केले, नोव्हेंबर २०१६ ची नोटबंदी, कलम ३७० रद्द, तीन तलाक बंदी, जीएसटी लागू, सर्जिकल स्ट्राईक असे अनेक निर्णय त्यांच्या कणखर, कार्यक्षम राज्यकर्त्याची साक्ष देणारे ठरले आहेत.

जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्वल करणारे, जागतिक स्तरावरील जी-२० मध्ये देशाचे उल्लेखनिय स्थान निर्माण करणारे अविश्रांत मेहनत करणारे पंतप्रधान नरेंद्र दामोदर गोदी यांचा ७६ वा वाढदिवरा १७ राप्टेंबरला साजरा होत आहे.

ज्या अमेरिकेने त्यांचा व्हिसा नाकारला होता, त्याच अमेरिकेच्या संसदेत मुद्देसूद भाषण करुन ती संसद ज्यांनी गाजवली, अशा न भूतो न भविष्यती मोदीजींना आपण कितीही विशेषणे दिली तरी कमीच पडतील. मातृभक्त, देशभक्त, अचाट स्मरणशक्तीचा महामेरू, वेळेचा पुजारी, देशाला प्रगतीपथावर नेण्याचा ध्यास असलेला, व त्यासाठी अहोरात्र झटणारा, आयुष्याचा प्रत्येक क्षण देशासाठी वेचणारा, त्यांना भारताचा शेर असेही म्हटले जाते. त्यांचे रुबाबदार चालवणे, बोलणे, पेहराव याचा सर्वांवर प्रभाव पडत असतो. त्यांच्यामुळे जॅकेट उदयाला आले, जे मोदी नावानेही विकले जाते.

मोदींचे एक वेगळे वैशिष्ट्य असे कि ते नातेवाईकांपासून दूर आहेत. देशसेवेसाठी नात्यांच्या पाशात अडकायचे नाही. त्यांचे भाऊ राशन दुकाने चालवतात. पेट्रोल पंपावर काम करतात, अजूनही साध्या घरात रहातात. फक्त मातृदेवो भव या उक्तीनुसार आईचे स्थान त्यांच्या मनात परमोच्च आहे. रोज सकाळी आईशी बोलल्यानंतर त्यांची कामाला सुरुवात होत असे.

आर्य चाणक्याने राजकारण आणि राजकीय सत्ताधीश यांचे एक आदर्श रूप मांडले आहे. आपल्या संस्कृत ग्रंथामध्ये राजाला देवाचे सगुण रूप म्हणून कल्पिले आहे. त्याकाळी राजा ही संकल्पना होती. राजा आणि त्याचा

कारभार कसा असावा, याचे देखणे दर्शन आपण आपले पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपात पाहतो आहोत.

खरं तर मोदी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून वर आले आहेत. वडील वाडनगर रेल्वे स्टेशनवर चहा विकायचे. मोदीजीही आपल्या वडिलांना मदत करायचे. अशातच ते ८ वर्षाचे असतांना बालस्वयंसेवक म्हणून संघात दाखल झाले. पदवीधर झाले, संघात काम करता करता संघटन मंत्री म्हणून १९८७ साली गुजरात भाजपमध्ये त्यांची नियुक्ती झाली. नंतर राष्ट्रीय संघटन (महामंत्री) म्हणून ते काम पाहू लागले. केंद्रीय कार्यालयात त्याकाळी ते एका खोलीतच रहायचे. त्यावेळी त्यांना कधीही स्वप्नात देखील वाटले नसेल कि, ते सक्रिय राजकारणात येतील. कारण संघटन मंत्र्यांनी फक्त संघटनेचेच काम पहायचे असते. संघटन कौशल्य असणारेच संघटन मंत्री व्हायचे. प्रत्यक्ष निवडणूक वगैरे त्यांच्या गावीही नसते. संघटन हा त्यांचा आत्मा!

परंतु २००१ साली त्यावेळचे लोकप्रिय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयीजी यांनी या नियमाला अपवाद म्हणून मोदीजींना हेरले व ऑक्टोबर २००१ ला गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून सत्तेच्या राजकारणात पेरले. हे पिक फोफावेल याची कदाचित त्यांना खात्री होती. अटलजीही द्रष्टेच होते.

आदर्श राजकारणी हा सामाजिक बांधिलकी निष्ठेने पार पाडणारा असावा असे संकेत असतात. परंतु अचानक एका पदाधिकाऱ्यांच्या बैठकीतून मोदींना अटलींचे बोलावणे आले. त्या शेवटच्या त्यांच्या बैठकीत मी राष्ट्रीय सचिव म्हणून सहभागी होते. त्यावेळची आमची टीम शिस्तबध्द रितीने संघटनेचे काम करायची. मग त्यात वेळेचे नियोजन, प्रत्येक राज्याचा सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, राजकीय अभ्यास करायचा, ज्याचे काम त्यानेच करायचे. मी २००० ला राष्ट्रीय सचिव झाले. मोदीजी महासचिव होते. प्रत्येकाच्या कामाकडे बारकाईने ते लक्ष द्यायचे. एका बैठकीत मी नक्वींकडून मिनिट बुक घेऊन मिनिटस् लिहिले. कारण मुख्तार अब्बास यांचे अक्षर कळत नव्हते. परंतु ही गोष्ट मोदीजींच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नाही. दुसऱ्याच दिवशी बैठकीत त्यांनी मिनिटस् बुक पाहिले व नक्वींचे कौतुक केले. 'अरे नक्वीजी, आपका हँडरायटिंग सुधर गया है' नक्वीजी खजील झाले, आणि सर्वांनी धडा घेतला आपले काम आपणच करावे. पण प्रस्ताव लिहिण्याचे



काम त्यांनी मला दिले.

माझ्या बाबतीत योगायोग असा की जुलै १९९९ मध्ये पुण्यात आमची राष्ट्रीय महिला मोर्चाची बैठक होती. मी महाराष्ट्राची महिला अध्यक्ष होते. मोदीजी संघटन महामंत्री या नात्याने महिलांना मार्गदर्शन करायला आले होते. बैठकीत प्रवेश करण्याअगोदर मला संघटनेबद्दल प्रदेश अध्यक्ष म्हणून अनेक प्रश्न त्यांनी विचारले, चर्चा केली, आणि ऑगस्ट २००० ला तर कुशाभाऊ ठाकरे, त्यावेळचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी अनेक चिंतन बैठकांमध्ये मला हेरले व बंगारुजी लक्ष्मण यांच्या टिममध्ये राष्ट्रीय सचिव म्हणून माझी घोषणा केली. मोदीजी महासचिव होतेच. अर्थातच त्यांच्या तालमीत आम्ही सगळे तयार झालो.

त्यांच्या वागण्यातून बोलण्यातून सत्ता कशासाठी याचे सुस्पष्ट उत्तर समजायचे. कारण ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून तयार झालेले होते. ही मुस म्हणजे देशाला परमवैभवापर्यंत नेणारे आजचे पंतप्रधान नरेंद्र मोदी! राष्ट्र परमवैभवात न्यायचे म्हणजे राजकारणही त्याच ध्येयाने भारले पाहिजे. सत्ताकारण ही त्याच दिशेने चालवले पाहिजे. ते कसे चालवायचे याची पध्दत जनसंघ- नेतृत्वाने आपल्या कार्यासाठी निश्चित केली होती. त्याच वाटेने मोदीजी आज वाटचाल करत आहेत.

गुजरातचे मुख्यमंत्री जेव्हा ते झाले, त्यावेळची गुजरातची परिस्थिती अनुकूल नव्हती. त्यातच गोध्रा कांड झाले. सत्तेचा अनुभव नसतानाही त्यांनीही सत्तेला नवा आयाम दिला. त्यांच्या मुख्यमंत्र्याच्या कालावधीत मी अनेक वेळा राष्ट्रीय महिला मोर्चा अध्यक्ष या नात्याने संघटनात्मक प्रवास केला. त्यांची कार्यपध्दती त्यावेळीही निरपेक्ष भावनेने गुजरातचा विकास या ध्येयाने प्रेरीत होती.

सन २०१३ ला राष्ट्रीय नेतृत्वाने त्यांना पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून घोषित केले. त्यावेळी त्यांनी १ वर्षात पूर्ण देश पालथा घातला. प्रत्येक राज्यातील राजकीय

परिस्थिती तपासली, वेगवेगळया विषयांवर अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञ युवकांच्या टिम तयार केल्या. त्यांना प्रशिक्षण दिले. समाज माध्यमांचा योग्य उपयोग कसा करावा विषय कसे हाताळायचे, सर्व बारकावे त्यांनी सांगितले. जवळ-जवळ १ वर्ष रात्रंदिवस काम करणारे देशभरातले शेकडो निवडक युवक कामाला लावले. अशा प्रकारे नियोजनबध्द कामाची आखणी केली आणि ती फळालाही आली. त्यामुळे ज्या भागात आम्ही नगण्य होतो, त्या भागातही आमचा विस्तार झाला. सन २०१४ व नंतर सन २०१९ मध्ये संसदेत सर्वाधिक खासदार, आमदारांचा पक्ष म्हणून भाजपा उदयाला आला.

मोदीजी खूप भावूक आहेत, अध्यात्मिक आहेत. म्हणूनच पहिल्याच दिवशी संसदेत प्रवेश करताना त्यांनी संसद भवनाला साष्टांग नमस्कार घातला. वर्षातले दोन्ही नवरात्रीचे व्रत ते खडतरपणे फक्त लिंबू पाण्यावर करतात. तरीही देश विदेशात प्रवास, भाषणे यात काही खंड नसतो. खरोखरच म्हणावे वाटते या सम हा.

ज्या राज्यात जातील, तिथली बोली भाषा, राजकीय सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, सांस्कृतिक परिस्थितीचा ते अभ्यास करतात. विशिष्ट विभूतीच्या स्मारकांना भेटी देतात. त्यांच्या समोर नतमस्तक होतात. महाराष्ट्रात - शिवाजी महाराज, राजस्थानात राणा प्रताप, कलकत्त्यात- स्वामी विवेकानंद, परमहंस ही उदाहरणे आहेत. अचाट स्मरणशक्ती कशी, तर समोर कोणताही मुद्दा व संदर्भाचा पेपर नसतो, तरीही आकडेवारीसह तास दोन तास न थकता ते बोलत रहातात. प्रत्येक राज्यात, सभांना संबोधित करतांना त्या राज्याच्या बोली भाषेत २ मिनिटे बोलून त्यांना अभिवादन करतात. त्या प्रांताची वैशिष्ट्येही त्यातून व्यक्त करतात. जनता विस्मयचकित होते, दाद देते. जनसंघाची स्थापना १९५१ ला झाली. आज ७० वर्ष झाली. मजल दर मजल करत १९९६ ची निवडणूक भाजपाच्या दृष्टीने मैलाची दगड ठरली. सर्वाधिक खासदार- परंतु १३ दिवसाचे ते सरकार होते. परंतु पुनःश्च हरीओम १९९८-९९ ला पुन्हा सत्ता प्राप्त केली. अटलबिहारी वाजपेयीसारखे प्रतिभावान, दूरदर्शी, ओजस्वी वक्ता पंतप्रधान म्हणून रुढ झाले.

सन २०१४ ला पुन्हा सत्ता आली. मोदींनी किमया केली. पूर्ण बहुमत मिळाले तरीही काही मित्र पक्षांच्या मदतीने सरकार आले. ५ वर्षात ग्रामीण क्षेत्राचा कायापालट



केला. मोठे निर्णय मागे ठेवले. प्राथमिक गरजांना प्राधान्य दिले, उदा. शौचालये, घरगुती गॅस, घरकुले वगैरे, सन २०१९ ला अनेकांनी भाकित केले होते, यावेळी मोदी जिंकणार नाहीत, परंतु त्यांच्या भाकितांना मोदीनी सुरुंग लावला. ३०० पेक्षा अधिक जागा जिंकून पंतप्रधानपदी पुन्हा विराजमान झाले. त्यांच्या कारकीर्दीचा आढावा घेणारे अनेक लेख येतील, परंतु मला भावलेले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी हे उच्च कोटीचे आहेत. अशा पंतप्रधानां बरोबर संघटनेत काम करण्याची संधी मला मिळाली हे माझे भाग्यच मी मानते. शक्तीसंपन्न भारत, वैभवशाली भारत, सामाजिक आर्थिक तणाव मुक्त भारत हे मोदीजींचे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्याचा वसा त्यांनी घेतला आहे. त्यासाठी स्वतःच्या तब्येतीकडे ते बारकाईने लक्ष देतात. रात्री ते ३ ते ४ तासच झोपतात. पहाटे लवकर उठून, चालणे, योगा, प्राणायाम, ध्यानधारणा करतात. यात कधीच खंड नसतो. खाण्यावर नियंत्रण, नेमकाच आहार, मांसाहार नाही. आरोग्यम् धनसंपदा याचे महत्व त्यांनी जोपासले आहे. अशा अजेय, शक्तीशाली, दूरदृष्टी असणाऱ्या पंतप्रधानांना मा. नरेंद्र मोदींना ७६ व्या वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**(लेखिका महिला मोर्चाच्या माजी राष्ट्रीय अध्यक्ष व माजी आमदार आहेत.)**

# मराठा विद्यार्थ्यांना ओबीसी प्रवर्गाप्रमाणे शैक्षणिक सोयी-सुविधा आणि सवलती

**मराठा समाजाला ओबीसी प्रमाणे शैक्षणिक सवलती:** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास वर्ग प्रवर्गाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयी-सुविधा आणि सवलतींचा लाभ तातडीने लागू करण्याचे तंत्रशिक्षण संचालनालयाने सर्व विद्यापीठांना आदेश.

**वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटींचा निधी:** EBC, EWS आणि SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून वितरित करण्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाला आदेश

**सारथी 'परदेश शिक्षण शिष्यवृत्ती' मर्यादेत वाढ:** सारथीमार्फत परदेशी विद्यापीठांची शिक्षण फी आता थेट संबंधित संस्थेस अदा केली जाईल, ज्यामुळे लाभाच्या रकमेची कमाल मर्यादा रद्द झाली आहे. तसेच विद्यार्थ्यांना दरवर्षी १५०० यूएस डॉलर (यूकेसाठी ११०० जीबीपी) अतिरिक्त निर्वाह भत्ता मंजूर

**तरुणांना मोफत ड्रायव्हिंग व कंडक्टर प्रशिक्षण:** 'सारथी' संस्थेने IDTRS पिंपरी-चिंचवडसोबत करार केला असून १ ऑक्टोबर २०२६ पासून १,४४० मराठा व कुणबी तरुणांना मोफत LMV, HMV ड्रायव्हिंग आणि कंडक्टर प्रशिक्षण दिले जाईल. यातून किमान १,००० लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देणे बंधनकारक केले जाईल.

### सारथीच्या उपक्रमांमधून मिळालेले यश

- ४ वर्षांत ८.३८ लाख लाभार्थी.
- ६४७ कोटींहून अधिक खर्च शिक्षण व प्रशिक्षणावर.
- शेकडो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश.
- हजारो युवकांचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण.
- उद्योजकता, संशोधन, ऐतिहासिक संवर्धन या क्षेत्रात ठोस योगदान.

### युपीएससी / एमपीएससी पूर्व प्रशिक्षण व शिष्यवृत्ती योजना

सारथी मार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी / एमपीएससी पूर्व प्रशिक्षण योजना) परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. या योजनेच्या माध्यमातून २०२० ते २०२४ या दरम्यान युपीएससीमध्ये ११२ आणि एमपीएससी १०४८ विद्यार्थ्यांची निवड झाली. एमपीएससीमध्ये निवड झालेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी २२९ विद्यार्थी हे क्लास वन आणि ८१९ विद्यार्थी क्लास टू श्रेणीमध्ये निवड झाले आहेत.

### डॉ. पंजाबराव देशमुख उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना (देशांतर्गत)

डॉ. पंजाबराव देशमुख उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजनेंतर्गत देशातील नामांकित २०० विद्यापीठांमधून शिक्षण घेणाऱ्या जवळपास ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांची शिक्षण, वसतीगृह, भोजन व परीक्षेसाठी भरलेल्या शुल्काचा १०० टक्के परतावा दिला जातो. २०२२ ते २०२४ या कालावधीत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यांना ५ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला होता. तर २०२४-२५ या आर्थिक वर्षात २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांना मार्च २०२५ पर्यंत ६ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

### महाराजा सयाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती योजना (परदेश शिक्षणासाठी)

गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय शिक्षणाची स्वप्ने साकार करण्यासाठी २०२३-२४ मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांना ६ कोटी रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तर २०२४-२५ मध्ये ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या योजनेंतर्गत परदेशात २ वर्षांचे पोस्ट ग्रॅज्युएशन (पीजी) करणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षासाठी ३० लाख रुपये तर ४ वर्षांसाठी पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षासाठी ४० लाख रुपये दिले जातात. ■

# एकात्म मानवतावाद व अंत्योदयाचे प्रणेते पंडीत दीनदयाळ उपाध्याय

● आ. निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस



> भारतीय राजकारणात निःस्वार्थ सामाजिक सेवा आणि निर्मळ राजकीय दृष्टी हा भारतीय विचार दर्शनाचा आदर्श प्रस्थापित करणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक तथा भारतीय जनसंघाचे अध्यक्ष राहिलेले पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची दिनांक २५ सप्टेंबर रोजी जयंती आहे. त्यांच्या जयंती निमित्ताने भारतीय जनसंघाच्या खडतर प्रवासाच्या वाटचालीचे व कठीण कार्याचे स्मरण करण्यासाठी लेख प्रपंच आहे.

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. भारतीय राजकारणामध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी साधी राहणी व प्रामाणिकपणा, समाजाप्रति उदात्त विचार, अंत्योदयाची तळमळ इत्यादीचा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच त्यांनी देशाच्या राजकीय क्षेत्रात सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि एकात्म मानवतावाद, अंत्योदयाचा उदात्त विचार सुद्धा मांडला आहे. आपल्या भारतीय ऋषींनीमुनी यांनी प्राचीन काळात

सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चिद् दुःखभाग् भवेत।।

हा भारतीय विचार दर्शन मांडले आहे सर्व लोक मानव सुखी असोत. सर्व रोगमुक्त असोत. सर्वांना शुभ व चांगलेच दिवस यावे, दुःखाचा वाटा येऊ नये. सर्वांचे कल्याण व्हावे एकूणच विश्वाच्या कल्याणाची भावना उपरोक्त श्लोकामध्ये व्यक्त केलेली आहे. तसेच सातशे वर्षापूर्वी महाराष्ट्र ज्ञानेश्वर माऊली यांनी सुद्धा, 'जो जे वांछील तो ते लाहो, प्राणिजात' जगातील प्रत्येक प्राण्याला, मानवाला त्याने जे चांगले इच्छिले आहे ते मिळो अशी विश्वमंगलाची, विश्व कल्याणाची प्रार्थना, 'पसायदान' केली आहे. ऋषीमुणींनी उपनिषद् तथा ज्ञानेश्वर माऊलीच्या पसायदानमधील जे भारतीय दर्शन आहे तोच भारतीय सुसंगत विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अंत्योदय आणि एकात्म मानववाद रूपाने मांडला. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतातील एक महान विचारवंत, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते होते. भारतीय संस्कृती आणि परंपरावर आधारीत समाजातील शेवटच्या घटकाच्या विकासाचे दिशादर्शन त्यांनी साध्या आणि सोप्या भाषेत मांडले आहे म्हणूनच त्यांना एकात्म मानवतावाद आणि अंत्योदय विचाराचे प्रणेते अथवा शिल्पकार सुद्धा म्हणतात.



सामान्य कुटुंबात जन्म घेऊन असामान्य कर्तृत्व करणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा जीवन प्रवास थक्क करणारा आहे. जन्म सामान्य कुटुंबात पण असामान्य कर्तृत्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विविध क्षेत्रामध्ये, सामान्य कुटुंबात जन्मलेल्या पण असामान्य कर्तुत्व करणाऱ्या पांढऱ्या कपड्यातील आधुनिक ऋषीची मोठी परंपरा आहे. दत्तोपंत ठेंगडीपासून यशवंतराव केळकर आणि एकनाथजी रानडे ते नानाजी देशमुख यांनी आपपल्या कार्यक्षेत्रात मोठा आदर्श निर्माण केला. त्याच परंपरेमध्ये भारतीय राजकारणामध्ये साधी राहणी व उदात्त विचाराची पेरणी करणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा उल्लेख मोठ्या श्रद्धेने केला जातो. त्यांचा जन्म दि.२५ सप्टेंबर १९१६ रोजी उत्तर प्रदेशातील नागला चंद्रभान (जि. मथुरा) येथे एका सामान्य कुटुंबात झाला. लहानपणीच त्यांचे आई-वडील वारले, त्यामुळे त्यांनी अनेक अडचणींवर मात करून कानपूर येथे पदवी व आग्र्याला पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले होते. अतिशय बुद्धिमान व अभ्यासू विद्यार्थी असलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे शिक्षण सुरू असताना विद्यार्थी दशेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबत संपर्क आला आणि ते संघ शाखेत नियमित जाऊ लागले. संघ संस्थापक डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरूजी व भाऊराव देवरस यांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. त्यांचे संघ अधिकाऱ्यासोबत संबंध एवढे घनिष्ठ होते की त्यांनी देश, समाज सेवा आणि राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रचारक होण्याचा निर्णय घेतला. संघाच्या कार्यपद्धतीनुसार संघ शिक्षा वर्गाचे शिक्षण पूर्ण करून ते १९४२ साली संघाचे प्रचारक म्हणून बाहेर पडले उत्तर प्रदेशातील लखीमपूर येथे जिल्हा प्रचारक म्हणून त्याचे कार्यक्षेत्र होते. संघाच्या विविध जबाबदारी पार पाडत त्यांनी संघाचे ज्येष्ठ प्रचारक भाऊराव देवरस यांच्या सोबत उत्तर प्रदेशसह प्रांत प्रचारक म्हणून दायित्वाचे निर्वाहन सुद्धा केले होते. उत्तर प्रदेशातील लखनौ, कानपूर, प्रयागराज, वाराणसी येथे त्यांनी संघ प्रचारक म्हणून संघ कार्य उभे केले होते. पुढे त्यांनी संघाच्या रचनेनुसार भारतीय राजकारणात प्रवेश केला. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक ते भारतीय जनसंघाचे राष्ट्रीय महासचिव असा असामान्य कर्तृत्वाचा प्रवास भारतीय राजकारणात आणि राजकीय कार्यकर्त्यांसाठी थक्क करणारा आहे. महात्मा गांधी यांच्या हत्येचा आरोप करुन संघावर १९४८ साली बंदी घालण्यात आली होती आणि काही महिन्यांनी बंदी उठली परंतु त्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे म्हणणे ऐकणारे राजकीय क्षेत्रात कोणीच नव्हते ना राजकीय पक्ष किंवा प्रसारमाध्यमे सुद्धा नव्हती तेव्हा राजकीय क्षेत्रात सांस्कृतिक राष्ट्रवादाचा विचार मांडणारी राजकीय संघटना असावी म्हणून जनसंघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला गेला. दिनांक २१ ऑक्टोबर १९५१ रोजी दिल्लीमध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वात भारतीय जनसंघाची स्थापना करण्यात आली. देशात स्वातंत्र्यानंतर राष्ट्रवादी विचार मांडणारा एक मजबूत राजकीय पक्ष उभा राहावा, या उद्देशाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पुढाकार घेऊन जनसंघाची स्थापना केली. सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक

पंडित दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, नानाजी देशमुख, लालकृष्ण अडवाणी, सुंदरसिंह भंडारी, कुशाभाऊ ठाकरे यांच्यासारख्या नेत्यांनी पक्षाच्या वाढीसाठी मोठे योगदान दिले. पंडित दीनदयाळ उपाध्याय संघटनेचे महासचिव होते आणि त्यांच्या नेतृत्वात संघटनेची ताकद वाढत होती. त्यांनी तर्कशुध्द एकात्म मानववाद आणि अंत्योदय ही विचारसरणी मांडली जी जनसंघाच्या धोरणांचा आधार बनली आणि त्या विचारधारेच्या आधारावर भारतीय जनसंघ देशांत फोफावला. सामान्य माणसाला जनसंघाचे धोरण पटू लागले. जनसंघाचे राष्ट्रीय अधिवेशन केरळमध्ये कालीकत येथे दि. २९ डिसेंबर १९६७ रोजी झाले होते. त्यावेळी कालिकत अधिवेशन अनेक अंगानी गाजले होते आणि याच अधिवेशनात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जनसंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली होती. त्याच काळात देशात झालेल्या लोकसभा निवडणुकीत जनसंघाला चांगले यशसुद्धा मिळाले होते.

१९६२ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनसंघचे १४ खासदार निवडून आले होते तर १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत जवळपास ३५ खासदार लोकसभेमध्ये निवडून आले होते. १९७७ मध्ये जनता पार्टी सरकार काळात तर जनसंघाचे जवळपास ९० खासदार होते. भारतीय जनसंघाचे अध्यक्ष असताना सुद्धा त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात ज्ञात असेल तेथे संघाची शाखा आणि श्री गुरुपूजन चुकले नाही. एकात्म मानवतावाद अर्थात भारतीय विचार दर्शन पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवतावाद ही विचारसरणी मांडली. त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार माणसाचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असून समाज, अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांचा समतोल राखून देशाचा विकास व्हावा, असे त्यांचे चिंतन होते. तसेच त्यांनी भारतीय संस्कृती व परंपरावर आधारित विकासाची दिशा सुचवून भारतीय संस्कृतीवर आधारीत महत्वपूर्ण आणि तर्कशुध्द तत्वज्ञान मांडले आहे. त्यांनी सखोल चिंतन करून राजकीय क्षेत्रात अंत्योदयाचा विचार सुद्धा मांडला आहे. त्या काळात पाश्चात्य देशांमध्ये भांडवलशाही आणि साम्यवाद या विचारधारा प्रचलित व प्रभावी होत्या. परंतु त्या विचारधारा पूर्णपणे मानव कल्याण साधू शकणाऱ्या नाहीत, अशी त्यांची स्पष्ट धारणा होती. त्यामुळे त्यांनी भारतीय परंपरेवर आधारित नवा मार्ग शोधला होता. एकात्म मानवतावादानुसार माणूस फक्त शरीर नसून त्यामध्ये शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा तथा व्यष्टी, समष्टी, सृष्टी, परमेष्ठी चार घटक असतात. त्यामुळे माणसाचा विकासही या सर्व घटकांचा विचार करूनच झाला पाहिजे. केवळ आर्थिक प्रगती किंवा भौतिक सुख यालाच महत्त्व देणे योग्य नाही. नैतिकता, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक विकासही तितकाच आवश्यक असल्याची त्यांची धारणा होती. त्यांच्या तत्त्वज्ञानात समाजाला एक कुटुंब मानले गेले आहे.

समाजातील सर्व घटक एकमेकांशी पूरक असून समन्वय, सहकार्य आणि बंधूभाव सुद्धा महत्त्वाचा असल्याचे त्यांचे ठाम मत होते. तसेच देशाचा विकास करताना भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्ये यांची जपणूक करणे एकात्म मानवतावादाचा मुख्य उद्देश म्हणजे सर्वांच्या कल्याणाचा विचार करणे होय आणि समतोल विकास घडवून आणणे होय. त्यांचा हा उदात्त विचार उपनिषद्‌मधील 'सर्वे भवंतु सुखिनः' या भारतीय तत्त्वाशी सुसंगत सुद्धा आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना जवळपास ५१ वर्षाचे आयुष्य लाभले होते. परंतु अल्प कालावधीत त्यांना राष्ट्रीय नेतृत्वाचा मान मिळाला होता. त्यांनी संघटना वाढविण्यासोबतच भारतीय विचार दर्शनानुसार समाजकारण, राजकारण, अर्थकारण इत्यादीचे सखोल चिंतन करून राष्ट्रधर्म, पांचजन्य, दैनिक स्वदेश, ऑर्गानायजरमधून विपूल लेखन केले. दिनांक ११ फेब्रुवारी १९६८ रोजी मुगलसराय येथून पाटणा येथे पक्ष कार्यासाठी रेल्वेने जात असताना रेल्वे डब्यात त्याचे आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या मृत्युचे गूढ आज ही कायम असून एका थोर चिंतकाची व ध्येय समर्पित जीवनाची अखेर मुगलसाराय रेल्वे स्टेशनवर झाली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशात राष्ट्र निर्माण आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रारंभ केलेल्या यज्ञात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची समिधा अर्पण झाली होती. आजच्या राजकीय कार्यकर्ते तथा नवीन पिढ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या निस्वार्थ जीवन कार्याची माहिती व्हावी आणि प्रेरणा मिळावी म्हणून हा लेख प्रपंच आहे.

**लेखक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन कार्याचे अभ्यासक तथा महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आहेत.**

# 10 वर्षांत झोपडपट्टीमुक्त मुंबई

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा व्यापक शहर परिवर्तन आराखडा

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा ही केवळ झोपडपट्टी हटविण्याची घोषणा नसून क्लस्टर पुनर्विकास, धारावी पुनर्विकास, म्हाडा वसाहतींचे पुनर्विकास, बेस्ट आगारांचा पुनर्विकास आणि मुंबईच्या वाढीचे एमएमआरकडे नियोजनबद्ध विकेंद्रीकरण अशा व्यापक शहरी परिवर्तनाच्या आराखड्याचा भाग आहे.

### ❶ मुंबईसमोरचे झोपडपट्टीचे आव्हान

**मुंबई** ही देशाची आर्थिक राजधानी असली, तरी तिच्या विकासाच्या चित्रात झोपडपट्ट्या हा मोठा विरोधाभास आहे. मर्यादित जमीन, प्रचंड लोकसंख्या, घरांच्या वाढत्या किमती, स्थलांतर आणि जुन्या वसाहतींची दुरवस्था यामुळे मुंबईच्या शहरी विकासाला अनेक वर्षे विस्कळीत स्वरूप आले.

● झोपडपट्टी हा केवळ निवाऱ्याचा प्रश्न नाही. तो पाणी, स्वच्छता, आरोग्य, वाहतूक, रोजगार, शिक्षण, सुरक्षितता आणि शहरी नियोजनाचा प्रश्न आहे. त्यामुळे 'झोपडीमुक्त मुंबई' या संकल्पनेचा अर्थ केवळ झोपड्या हटविणे नसून झोपडपट्टीतील नागरिकांना सन्मानजनक आणि कायदेशीर घर देत त्याच वेळी संपूर्ण परिसराचा पुनर्विकास करणे असा असला पाहिजे.

● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३ सप्टेंबर २०२६ रोजी NREDCO महाराष्ट्राच्या कार्यक्रमात पुढील दहा वर्षांत मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचा विश्वास व्यक्त केला. यासाठी मुख्य साधन म्हणून क्लस्टर पुनर्विकासाचा दृष्टिकोन मांडण्यात आला आहे.



### ❷ '१० वर्षांत झोपडपट्टीमुक्त मुंबई' म्हणजे नेमके काय?

**मुख्यमंत्र्यांच्या घोषणेकडे एका स्वतंत्र योजनेऐवजी मुंबईच्या मोठ्या पुनर्विकास मोहिमेचे लक्ष्य म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल.**

- या दृष्टिकोनाचे काही प्रमुख आधार आहेत –
- झोपडपट्ट्यांचा क्लस्टर पद्धतीने पुनर्विकास
- धारावीचा मोठ्या प्रमाणावरील पुनर्विकास
- म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास
- रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती
- बेस्टच्या जुन्या आगारांचा पुनर्विकास
- निवासी आणि व्यावसायिक वापराचे मिश्र नियोजन
- नवीन सार्वजनिक सुविधा
- मुंबईतील उपलब्ध जमिनीचा अधिक कार्यक्षम वापर
- एमएमआरमध्ये नवीन शहरी केंद्रे विकसित करून मुंबईवरील लोकसंख्येचा दबाव कमी करणे म्हणजेच 'झोपडपट्टी हटविणे' नव्हे तर 'झोपडपट्टीचे नियोजित शहरी वस्तीत रूपांतर' हा या धोरणाचा केंद्रबिंदू असायला हवा.

### ❸ क्लस्टर पुनर्विकास : या योजनेचा कणा

**मुंबईत अनेक झोपडपट्ट्या छोट्या-छोट्या भूखंडांवर, वेगवेगळ्या मालकीच्या जमिनीवर किंवा जुन्या इमारतींच्या आसपास विखुरलेल्या आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येक इमारत किंवा झोपडी स्वतंत्रपणे पुनर्विकसित करणे वेळखाऊ ठरते. यासाठी** Cluster Redevelopment

**हा महत्त्वाचा पर्याय आहे. क्लस्टर पद्धतीमध्ये एकाच परिसरातील अनेक भूखंड, झोपडपट्ट्या, जुन्या इमारती आणि इतर उपलब्ध जमीन एकत्रित करून मोठ्या प्रमाणावर नियोजन केले जाते. यामुळे –**

- मोठे पुनर्वसन प्रकल्प उभे राहू शकतात.
- रस्त्यांची नव्याने आखणी करता येते.
- पाणी आणि मलनिस्सारण व्यवस्था सुधारता येते.
- उद्याने व मैदाने निर्माण करता येतात.
- शाळा, दवाखाने आणि सार्वजनिक सुविधा निर्माण करता येतात.
- वाहतूक व्यवस्था सुधारता येते.
- उपलब्ध जमिनीचा अधिक कार्यक्षम वापर होऊ शकतो.
- मुख्यमंत्र्यांनी मुंबईच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर पद्धतीचा अवलंब करण्याचे स्पष्ट केले आहे.

### ❹ धारावी : संपूर्ण मोहिमेचे सर्वात मोठे प्रतीक

**मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या संकल्पनेत धारावी पुनर्विकास प्रकल्पाला निर्णायक महत्त्व आहे. धारावीचा पुनर्विकास हा केवळ गृहनिर्माण प्रकल्प नाही. तो एक मोठा urban transformation project आहे. सरकारने धारावी पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात जानेवारी २०२९ पर्यंत १० हजार पुनर्वसन सदनिका तयार करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या घरांच्या चाव्या पात्र कुटुंबांना देण्याचे लक्ष्य स्वतः जाहीर केले आहे.**

**धारावी प्रकल्पाचे महत्त्व पुढील कारणांमुळे मोठे आहे**

- पहिले, धारावी मुंबईच्या मध्यवर्ती भागात आहे.
- दुसरे, येथे मोठ्या प्रमाणावर निवासी व व्यावसायिक उपक्रम एकत्र अस्तित्वात आहेत.
- तिसरे, धारावीतील रहिवाशांचा रोजगार मोठ्या प्रमाणावर स्थानिक उद्योगांशी जोडलेला आहे.
- त्यामुळे पुनर्विकासात केवळ घरे देऊन प्रश्न सुटणार नाही. घर + रोजगार + वाहतूक + सामाजिक पायाभूत सुविधा या चौकटीत पुनर्विकास करावा लागेल.
- धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अधिकृत माहितीनुसार हा प्रकल्प जमीन संसाधनाचा वापर करून झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन आणि त्याचवेळी नियोजित विकास साधण्याच्या संकल्पनेवर आधारित आहे.

### ❺ म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास

**मुंबईतील प्रश्न फक्त झोपडपट्ट्यांपुरता मर्यादित नाही. अनेक जुन्या म्हाडा वसाहती, जुन्या इमारती आणि कालबाह्य शहरी वस्त्या देखील पुनर्विकासाची गरज असलेल्या आहेत.**

**म्हाडाच्या वसाहतींचा पुनर्विकास झाल्यास –**

- जुन्या इमारतींचे रूपांतर आधुनिक इमारतींमध्ये होईल.
- रहिवाशांना चांगली घरे मिळतील.
- अतिरिक्त जमीन उपलब्ध होऊ शकते.
- नवीन रस्ते व सार्वजनिक सुविधा निर्माण करता येतील.
- परिसराचे नियोजन नव्याने करता येईल.
- मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी क्लस्टर पुनर्विकासाबरोबरच MHD layouts च्या पुनर्विकासावरही भर दिला आहे. म्हणूनच 'झोपडपट्टीमुक्त मुंबई' ही संकल्पना प्रत्यक्षात 'जुनी मुंबई पुनर्विकसित मुंबई' या व्यापक संकल्पनेशी जोडली जाऊ शकते.

### ❻ रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती

**मुंबईच्या पुनर्विकासातील मोठी अडचण म्हणजे अनेक प्रकल्प वर्षानुवर्षे रखडणे यामागे अनेक कारणे आहेत –**

- रहिवाशांची पात्रता निश्चित करण्यात विलंब
- विकासकांशी संबंधित अडचणी
- जमीन मालकीचे वाद
- परवानग्यांचा विलंब
- आर्थिक अडचणी
- रहिवाशांचा विरोध
- न्यायालयीन प्रकरणे
- पुनर्वसनाच्या पर्यायी निवासाची समस्या
- २०२५ मध्ये म्हाडाने डझनोबतच्या १७ रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय घेतला होता; त्यातून सुमारे २५ हजार अतिरिक्त घरांची निर्मिती होण्याची शक्यता नमूद करण्यात आली होती. यातून स्पष्ट होते की दहा वर्षांचे लक्ष्य गाठण्यासाठी नवीन प्रकल्पांपेक्षा जुन्या प्रकल्पांची अडथळामुक्त अंमलबजावणी तितकीच महत्त्वाची आहे. ■

# जमिनीच्या डिजिटल कुंडलीतून विकासाला गती

## लँड बँक स्थापनेचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय

> महाराष्ट्राच्या विकासाचा वेग वाढवायचा असेल तर जमीन हा त्यातील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. महामार्ग, रेल्वे, बुलेट ट्रेन, औद्योगिक प्रकल्प, वीजवाहिन्या, सिंचन योजना अशा कोणत्याही मोठ्या प्रकल्पासमोर जमीन उपलब्धता, मालकी हक्क, फेरफार नोंदी, न्यायालयीन वाद आणि भूसंपादन हे मोठे अडथळे ठरतात. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र लँड बँक' आणि 'महाभूमी स्टॅक' हे दोन महत्त्वाकांक्षी उपक्रम पुढे आणले आहेत. राज्यात ४० हजार हेक्टरहून अधिक जमीन लँड बँकेच्या माध्यमातून डिजिटल स्वरूपात नोंदविण्यात आली आहे.



**'महाराष्ट्र लँड बँक'**चा सर्वांत मोठा फायदा म्हणजे विकास प्रकल्पांसाठी उपलब्ध असलेल्या जमिनीची माहिती एका केंद्रीकृत व्यवस्थेत मिळणे. विशेषतः पर्यायी वनीकरणासाठी आवश्यक जमीन शोधणे, तिची उपलब्धता तपासणे आणि संबंधित विभागांमध्ये हस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ करणे शक्य होईल. त्यामुळे केवळ जमीन शोधण्यासाठी लागणारा वेळ कमी होणार नाही, तर मोठ्या प्रकल्पांच्या मंजुरी प्रक्रियेलाही गती मिळू शकते.

महाराष्ट्र लँड बँक ही राज्य सरकारने सुरू केलेली एक विशेष डिजिटल यंत्रणा आहे, ज्याचा मुख्य उद्देश राज्यातील उपलब्ध जमिनींची माहिती एकाच ठिकाणी आणून औद्योगिक विकासाला चालना देणे आहे. या प्रणालीमुळे उद्योगपती आणि शेतकरी/जमीन मालक दोघांनाही मोठे फायदे होतात.

### याचे मुख्य फायदे

**उद्योजकांसाठी फायदे–** एकाच ठिकाणी सर्व माहिती: उद्योजकांना एकाच पोर्टलवर राज्यातील सर्व उपलब्ध शासकीय आणि औद्योगिक (MIDC) जमिनींची माहिती मिळते.

**पारदर्शकता:** जमिनीचे स्थान, क्षेत्रफळ, नकाशा आणि उपलब्ध पायाभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज) यांची स्पष्ट माहिती मिळाल्यामुळे गैरव्यवहारांना आळा बसतो.

**वेळेची बचत:** जमीन शोधण्यासाठी आणि सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारण्यासाठी लागणारा वेळ आणि श्रम मोठ्या प्रमाणावर वाचतात.

**गुंतवणुकीला गती:** परदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात उद्योग सुरू करण्यासाठी तात्काळ जमीन निवडणे सोपे जाते, ज्यामुळे राज्यात नवीन प्रकल्प लवकर सुरू होतात.

**जमीन मालक आणि शेतकऱ्यांसाठी फायदेजमिनीला योग्य भाव:** शेतकरी किंवा खाजगी जमीन मालक त्यांच्या पडीक किंवा वापराविना असलेल्या जमिनी या बँकेत नोंदवू शकतात, ज्यामुळे त्यांना जमिनीची चांगली किंमत किंवा भाडे मिळू शकते. थेट व्यवहार: सरकार किंवा मोठे उद्योग थेट जमिनीची माहिती पाहू शकत असल्याने, मध्यस्थांची (दलालांची) गरज उरत नाही. यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक टळते.

**रोजगाराच्या संधी:** परिसरात उद्योग आल्यामुळे स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात.

## राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी फायदे

**औद्योगिक विकास:** राज्यातील मागास किंवा ग्रामीण भागातही उद्योगांचे जाळे पसरवण्यास मदत होते.

**डिजिटायझेशन:** जमिनींचे नकाशे (GIS Mapping) आणि मालकी हक्क डिजिटल झाल्यामुळे जमीन व्यवस्थापन अधिक मजबूत आणि आधुनिक झाले आहे.

दुसरीकडे 'महाभूमी स्टॅक' हा भूमी अभिलेखांच्या डिजिटल एकत्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे. ७/१२, ८-अ, फेरफार, भू-नकाशे, मालमत्ता पत्रक, जुने दस्तऐवज आणि उपलब्ध न्यायालयीन प्रकरणांची माहिती एका डिजिटल प्रवेशद्वारावर आणण्याचा प्रयत्न या प्रणालीत आहे. अधिकृत महाभूमी पोर्टलवरही 'महाभूमी स्टॅक'च्या माध्यमातून हक्क अभिलेख पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे.

## एकाच ठिकाणी सर्व माहिती:

**महाभूलेख, महाभूनकाशा यांसारख्या वेगवेगळ्या पोर्टलवर विखुरलेली माहिती आता एकाच छताखाली मिळाली आहे.**

**सर्च रिपोर्ट:** ग्रामीण भागासाठी गट/सर्व्हे क्रमांक आणि शहरी भागासाठी सी.टी.एस. क्रमांक टाकून जमिनीचा संपूर्ण इतिहास किंवा सर्च रिपोर्ट एका क्लिकवर पाहता येतो.

**पारदर्शकता:** जमीन खरेदी करण्यापूर्वी त्यावर बँकेचा बोजा आहे का, मालक कोण आहे आणि न्यायालयीन वाद सुरू आहे का, हे घरबसल्या तपासता येते.

याचे दूरगामी परिणाम व्यापक असतील. जमीन खरेदी-विक्रीपूर्वी संबंधित मालमत्तेची माहिती नागरिकांना सहज तपासता येईल. त्यामुळे बनावट कागदपत्रे, दुहेरी विक्री, चुकीच्या फेरफार नोंदी आणि जमीन व्यवहारातील फसवणुकीला आळा बसण्यास मदत होऊ शकते. गुंतवणूकदारांसाठी जमीनविषयक माहिती अधिक सहज उपलब्ध झाल्याने उद्योग आणि पायाभूत क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना मिळू शकते. महसूल प्रशासनातील मानवी हस्तक्षेप कमी झाल्याने भ्रष्टाचार आणि अनावश्यक विलंबावरही नियंत्रण येण्याची शक्यता आहे.

मात्र डिजिटल व्यवस्था म्हणजे सर्व समस्यांवरचा रामबाण उपाय नाही. जुन्या जमीन नोंदींमध्येच जर चुका असतील तर त्या डिजिटल झाल्यानंतर त्या अधिकृत स्वरूपात पुढे जाण्याचा धोका आहे. चुकीची मालकी, अपूर्ण फेरफार, वारसाहक्कातील वाद किंवा नोंद न झालेली प्रत्यक्ष मालकी यामुळे सामान्य नागरिकांचे नुकसान होऊ शकते. त्याहून गंभीर प्रश्न म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणातील जमीनविषयक माहितीची गोपनीयता आणि सायबर सुरक्षा. डिजिटल प्रणाली हॅक झाल्यास किंवा माहितीचा गैरवापर झाल्यास त्याचे परिणाम गंभीर असू शकतात. त्यामुळे सरकारने याबाबत विशेष लक्ष देण्याचा निर्णय घेतला आहे.

विकासाला गती देताना सरकार 'वेग' आणि 'न्याय' यांचा समतोल साधणार आहे. प्रत्येक डिजिटल नोंदीला अंतिम सत्य मानण्यापूर्वी प्रत्यक्ष पडताळणी, दुरुस्तीची सुलभ प्रक्रिया आणि नागरिकांना अपीलची संधी दिली जाईल. शेतकरी, आदिवासी, भूमिहीन आणि पारंपरिक हक्कधारकांच्या हक्कांकडे विशेष लक्ष देण्याचे तसेच जमीन संपादन किंवा हस्तांतरणात पारदर्शक भरपाई आणि पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य मिळावे, असे सरकारचे धोरण आहे. 'महाराष्ट्र लँड बँक' आणि 'महाभूमी स्टॅक' हे महाराष्ट्राच्या भूमी प्रशासनाला आधुनिक करण्याचे प्रभावी साधन ठरू शकतात. ■

# सामान्य ग्राहकाला UPI चे शुल्क द्यावे लागणार नाही

## सामान्य माणसाचे वैयक्तिक व्यवहार पूर्णपणे मोफत आहेत

**१.) प्रश्न : यूपीआयवर एमडीआर म्हणजे काय?**
**उत्तर :** एमडीआर हे व्यापाऱ्याने यूपीआयद्वारे पैसे स्वीकारण्यासाठी दिलेले शुल्क आहे.

**२.) प्रश्न : हे शुल्क कोणासाठी लागू आहे?**
**उत्तर :** हे शुल्क फक्त व्यापाऱ्यांना लागू आहे.

**३.) प्रश्न : ग्राहकांना यूपीआय वापरताना शुल्क द्यावे लागेल का?**
**उत्तर :** नाही. ग्राहकांसाठी यूपीआय वापरणे पूर्णपणे मोफत आहे.

**४.) प्रश्न : लहान व्यवहारांवर शुल्क लागेल का?**
**उत्तर :** २००० रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर कोणतेही शुल्क लागणार नाही.

**५.) प्रश्न : २००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांवर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** २००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क आहे.

**६.) प्रश्न : शुल्काची कमाल मर्यादा किती आहे?**
**उत्तर :** एका यूपीआय व्यवहारासाठी जास्तीत जास्त शुल्क ३०० रुपये असेल.

**७.) प्रश्न : दोन व्यक्तींमधील व्यवहारांवर शुल्क लागेल का?**
**उत्तर :** नाही. मित्रांना किंवा नातेवाईकांना पैसे पाठवणे पूर्णपणे मोफत आहे.

**८.) प्रश्न : हे नवीन नियम कधीपासून लागू होतील?**



**उत्तर :** हे नियम १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होतील.

**९.) प्रश्न : लहान व्यापाऱ्यांना यातून सूट आहे का?**
**उत्तर :** होय. ज्या व्यापाऱ्यांना महिन्यात १ लाख रुपयांपर्यंत मिळतात त्यांना सूट आहे.

**१०.) प्रश्न : P2PM व्यापारी म्हणजे कोण?**
**उत्तर :** महिना १ लाख रुपयांपर्यंत व्यावसायिक उत्पन्न असलेले छोटे व्यापारी म्हणजे P2PM व्यापारी.

**११.) प्रश्न : लहान व्यापाऱ्यांनी २००० रुपयांपेक्षा मोठा व्यवहार स्वीकारल्यास शुल्क लागेल का?**
**उत्तर :** नाही. लहान व्यापाऱ्यांना २००० रुपयांवरील

व्यवहारावरही शून्य शुल्क असेल.

**१२.) प्रश्न : व्यापारी ग्राहकांकडून हे शुल्क वसूल करू शकतात का?**
**उत्तर :** नाही. व्यापारी हे शुल्क ग्राहकांवर टाकू शकत नाहीत.

**१३.) प्रश्न : यूपीआय ॲप्स अतिरिक्त फी आकारू शकतात का?**
**उत्तर :** नाही. यूपीआय ॲप्स ग्राहकांकडून कोणतीही प्लॅटफॉर्म फी घेऊ शकत नाहीत.

**१४.) प्रश्न : रेल्वे तिकीट खरेदीवर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** रेल्वे तिकिट खरेदीवर प्रति व्यवहार ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

**१५.) प्रश्न : टेलिकॉम आणि मोबाईल रिचार्जवर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** यावर २००० रुपयांवरील व्यवहारासाठी ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

**१६.) प्रश्न: विमा हप्ता भरण्यावर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** विमा हप्त्यासाठी २००० रुपयांवरील व्यवहारावर ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

**१७.) प्रश्न : पेट्रोल पंप आणि इंधनावर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** इंधनासाठी २००० रुपयांवरील व्यवहारावर ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

**१८.) प्रश्न : शेती साहित्याच्या खरेदीवर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** शेती साहित्यासाठी २००० रुपयांवरील व्यवहारावर ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

**१९.) प्रश्न : म्युच्युअल फंड आणि शेअर बाजारातील व्यवहारांवर किती शुल्क आहे?**
**उत्तर :** भांडवली बाजारातील व्यवहारांवर ०.०२ टक्के शुल्क लागू होईल.




**२०.) प्रश्न : शेअर बाजारातील व्यवहारांसाठी कमाल शुल्क किती आहे?**
**उत्तर :** या व्यवहारांसाठी कमाल शुल्क ३०० रुपये निश्चित केले आहे. अर्थात ०.०२% किंवा ३०० रुपये, जी रक्कम कमी असेल ती.

**२१.) प्रश्न : एसआयपी गुंतवणुकीवर एमडीआर लागू होईल का?**
**उत्तर :** नाही. एसआयपीद्वारे केलेल्या गुंतवणुकीवर एमडीआर लागू होणार नाही.

**२२.) प्रश्न : ऑटोपे किंवा वारंवार होणाऱ्या देयांवर शुल्क लागेल का?**
**उत्तर :** नाही. ऑटोपे आणि वीज बिलांसारख्या ऑटोमॅटिक देयांवर शुल्क लागणार नाही.

**२३.) प्रश्न : व्यापारी त्यांचा क्यूआर कोड बदलण्याची गरज आहे का?**
**उत्तर :** नाही. सध्याचे क्यूआर कोड आणि साऊंडबॉक्स तसेच सुरू राहतील.

**२४.) प्रश्न : या शुल्काची वसूली का केली जात आहे?**
**उत्तर :** यूपीआय यंत्रणा अधिक सुरक्षित आणि मजबूत करण्यासाठी हे शुल्क घेतले जात आहे.

**२५.) प्रश्न : या पैशांचा वापर कशासाठी केला जाईल?**
**उत्तर :** यूपीआय संबंधित सायबर सुरक्षा आणि नवीन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी.

**२६.) प्रश्न : गोळा झालेल्या शुल्कातून लहान व्यापाऱ्यांना काय फायदा होईल?**

**उत्तर :** लहान व्यापाऱ्यांमध्ये डिजिटल पेमेंट वाढवण्यासाठी एक विशेष निधी तयार केला जाईल.




**२७.) प्रश्न : विशेष निधीत किती रक्कम जमा केली जाईल?**

**उत्तर :** गोळा झालेल्या एकूण एमडीआरपैकी ५ टक्के रक्कम या निधीत जाईल.

**२८.) प्रश्न : क्रेडिट कार्डच्या तुलनेत यूपीआयचे एमडीआर किती आहे?**

**उत्तर :** यूपीआयचे एमडीआर क्रेडिट कार्डपेक्षा खूपच कमी आहे.

**२९.) प्रश्न : डेबिट कार्डच्या तुलनेत यूपीआयचे एमडीआर किती आहे?**

**उत्तर :** यूपीआयचे एमडीआर डेबिट कार्डपेक्षाही कमी आहे.

**३०.) प्रश्न : दैनंदिन लहान खरेदीवर या निर्णयाचा काय परिणाम होईल?**

**उत्तर :** ९५ टक्क्यांपेक्षा जास्त व्यवहार व्यापाऱ्यांसाठी मोफतच राहतील.

**३१.) प्रश्न : ३ हजार रुपयांच्या व्यवहारावर व्यापाऱ्याला किती शुल्क द्यावे लागेल?**

**उत्तर :** ३००० रुपयांवर व्यापाऱ्याला १२ रुपये शुल्क द्यावे लागेल.

**३२.) प्रश्न : ५० हजार रुपयांच्या व्यवहारावर व्यापाऱ्याला किती शुल्क द्यावे लागेल?**

**उत्तर :** ५०हजार रुपयांवर व्यापाऱ्याला २०० रुपये शुल्क द्यावे लागेल.

**३३.) प्रश्न : ७५ हजार रुपये आणि १ लाख रुपयांच्या व्यवहारावर व्यापाऱ्याला किती शुल्क द्यावे लागेल?**

**उत्तर :** ७५ हजार रुपयांवर ३०० रुपये. परंतु ३०० रुपयांची मर्यादा असल्याने त्यावरील कोणत्याही व्यवहारासाठी व्यापाऱ्याला ३०० रुपयेच शुल्क द्यावे लागेल.

**३४.) प्रश्न : सलग तीन महिने १ लाखांपेक्षा जास्त जमा झाल्यास काय होईल? दर बदलतील का?**

**उत्तर :** तो व्यापारी आपोआप मोठ्या व्यापाऱ्यांच्या श्रेणीत हलवला जाईल. या नियमांचा दर एका वर्षात आढावा घेतला जाईल.

**३५.) प्रश्न : रुपे डेबिट कार्डद्वारे केलेल्या यूपीआय व्यवहारांवर शुल्क आहे का?**

**उत्तर :** रुपे डेबिट कार्ड वापरून केलेल्या व्यवहारांवर शून्य शुल्क राहील.

**३६) प्रश्न: सरकारी योजनांमधील लहान व्यापाऱ्यांना याचा लाभ मिळेल का?**

**उत्तर :** होय. पीएम स्वनिधी आणि पीएम विश्वकर्मा योजनेतील व्यापाऱ्यांना विशेष सूट मिळेल.

**३७.) प्रश्न : व्यापाऱ्यांच्या खात्यातून हे शुल्क कसे कापले जाईल?**

**उत्तर :** बँक व्यवहार पूर्ण झाल्यावर ठरलेले शुल्क आपोआप कापून घेईल.

**३८.) प्रश्न : हे नियम निश्चित करणारे प्राधिकरण कोणते आहे?**

**उत्तर :** भारत सरकारचे नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया म्हणजेच एनपीसीआय हे नियम निश्चित करते.

**– रुपाली म्हात्रे**

# 'यूपीआय'मुळे झालेले बदल

**यूपीआय वापरल्याने प्रत्येक रुपयाचा हिशेब लागतो कारण प्रत्येक व्यवहाराचा डिजिटल पुरावा उपलब्ध असतो.**

**यूपीआय** ॲप्समध्ये व्यवहारावर शेरा (रिमार्क) लिहिण्याची सुविधा असल्याने काही महिन्यांनंतरही तुम्ही सहज पाहू शकता – अमुक दिवशी नेमका कोणता खर्च झाला आणि का झाला. अशा प्रकारच्या डेटा ट्रॅकिंगमुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे सोपे जाते. मोबाइलवर बॅलन्स झटपट तपासता येतो, त्यामुळे विचारपूर्वक खर्च करण्याची सवय लागते. त्याच्या उलट रोख व्यवहारांमध्ये पैशांचा प्रवाह अस्पष्ट असतो. सकाळी किती खर्च झाला हे संध्याकाळी विसरण्याची शक्यता मोठी असते, त्याचा कोणताही डिजिटल पुरावा नसतो.

बिले, कर, इंधन, तिकीट वगैरे अत्यावश्यक खर्चांसाठी यूपीआय हा एक अत्यंत सुलभ मार्ग आहे  अधिक खर्च होण्याचे कारण नाही. या खर्चांचे स्वरूपच अत्यावश्यक श्रेणीत मोडत असल्यामुळे ते करायचेच आहेत, मग ते णझख, कार्ड, किंवा रोख काहीही वापरून केले तरी खर्च व्हायचे ते होतातच. ही केवळ वेळेची बचतच नाही, तर आर्थिक शिस्त, ट्रॅकिंग सुलभ करणारी एक क्रांतीच आहे.

यूपीआय या माध्यमाने अवघ्या काही सेकंदांत देशभरातील व्यवहार शक्य झाले आहेत – उदाहरणार्थ, तुम्ही पुण्यामुंबईत असतानाही आपल्या गावातील वीजबिल भरू शकता. याशिवाय रोजच्या सुट्ट्या पैशांवरील वाद संपले आणि लहानातले लहान व्यवहार सुलभ झाले, ही सोय मोठी आहे. जास्त खर्च यूपीआयमुळे होतो हा दावा वर्तनशास्त्राच्या दृष्टीने चुकीचा आहे. खरे कारण खरेदीचा निर्णय कसा घेतला जातो यात दडलेले असते. एकदा तुम्ही काय खरेदी करायचे, किती खरेदी करायचे आणि बजेट किती ठेवायचे हे ठरवलं की पेमेंटचा प्रकार गौण ठरतो. यूपीआयमुळे आकस्मिकता वाढत नाही– आपल्या निर्णय प्रक्रियेतील भावनात्मक घटकच खरे कारण असतात.

वस्तू खरेदीची गरज ही मानसशास्त्रीय प्रेरणा फार मोठी भूमिका बजावते. मॉल्समध्ये यूपीआय येण्याआधीही लोक अनावश्यक वस्तू घेत असत – कारण वातावरण, ऑफर्स, आणि मूल्याची भ्रामक कल्पना यांचा परिणाम होत असे. ऑनलाइन खरेदीमध्येही हेच दिसते. स्क्रोल करताना सतत नवीन पर्याय दिसल्यामुळे थोडे अजून बघू हा मोह वाढतो आणि शेवटी निर्णय घाईघाईने घेतला जातो. यावर उपाय म्हणजे स्वतःवर नियंत्रण ठेवणे आणि खरेदीपूर्वी थोडी थांबून विचार करणे. बाह्य घटकांना दोष देणे – जसे की यूपीआय, ई–कॉमर्स किंवा जाहिराती – या गोष्टी मुळात उपाय नाहीत, कारण समस्या आपली वस्तू खरेदीची गरज नियंत्रणात नसणे ही आहे.

कुठलीही नवी सुविधा – मग ती यूपीआय असो किंवा आणखी काही – मुळात वाईट असू शकत नाही. तिची गुणवत्ता आणि परिणाम हे वापरकर्त्याच्या प्रगल्भतेवर अवलंबून असतात. आपण जर स्वतःच्या मोहांवर नियंत्रण ठेवू शकत नाही, तर त्या वापराचे परिणामही विपरीत होतात. दोष तंत्रज्ञानाला न देता स्वतःच्या निर्णयांना जबाबदार ठरणे ही खरी आर्थिक प्रगल्भता आहे.

'यूपीआय'मुळे भारतातील व्यवहारविश्व अधिक पारदर्शक, सुरक्षित, आणि सर्वसमावेशक बनले आहे – ही संधी आहे, दोष नाही. शिवाय, 'यूपीआय'मुळे मोठ्या प्रमाणात खोट्या नोटांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण आलं आहे हा देशाला आणि पर्यायाने आपल्यालाच झालेला फायदा नव्हे काय? 'यूपीआय'मुळे ज्यांची दुकाने बंद झालेली आहेत किंवा व्यवसायात घट झालेली आहे अशा व्हिसा आणि मास्टर कार्डसारख्या देशातील पैसे बाहेर नेणाऱ्या कंपन्यांना हे बघवणे अवघड जात असल्यानेच या अशा प्रकारच्या भावनिक कंड्या पिकवण्यात आल्या असाव्यात अशी शंका आहे. आता रूपे क्रेडिट कार्डही यूपीआयशी जोडता येते, त्यामुळे ही जळजळ वाढली असल्यास आश्चर्य नाही.

**– मंदार जोशी**

# मालवाहतूक क्षेत्रातील क्रांती



भारताच्या लॉजिस्टिक क्षेत्राला नवी दिशा देणारा वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर देशाच्या आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होऊन भारताला जागतिक पुरवठा साखळीत अधिक सक्षम स्थान मिळेल. भविष्यात किफायतशीर मालवाहतुकीच्या क्षेत्रात भारत चीनला टक्कर देऊ शकेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**वेस्टर्न** डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोअरच्या जेएनपीटी ते न्यू उंबरगाव या महत्त्वाच्या टप्प्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

### महाराष्ट्रातून १७८ किलोमीटरचा मार्ग

दादरी, उत्तर प्रदेश ते जेएनपीटी असा हा महत्त्वाकांक्षी फ्रेट कॉरिडोर विकसित करण्यात येत आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि उत्तर प्रदेश या पाच राज्यांमधून सुमारे १ हजार ५०० किलोमीटरचा रेल्वेमार्ग या प्रकल्पाचा भाग आहे. यातील महाराष्ट्रातून जाणारा सुमारे १७८ किलोमीटरचा टप्पा महत्त्वाचा असून, त्यासाठी राज्यात सुमारे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. संपूर्ण वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर प्रकल्पाचा खर्च सुमारे १ लाख ३० हजार कोटी रुपये असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### दलदलीच्या आणि डोंगराळ भागात मोठे इंजिनिअरिंग आव्हान

न्यू उंबरगाव ते जेएनपीटी हा प्रकल्पातील महत्त्वाचा

'मिसिंग लिंक' होता. पालघर, वसई, वैतरणा आणि उल्हास नदी परिसरातील दलदलीचा भाग तसेच डोंगराळ भूप्रदेशामुळे या मार्गाचे बांधकाम मोठे आव्हानात्मक ठरले.

या मार्गावर डबल-डेकर कंटेनरची वाहतूक लक्षात घेऊन आवश्यक उंचीची संरचना उभारली जात आहे. डोंगराळ भागात बोगदे, तसेच विविध फ्लायओव्हर आणि गर्डर उभारण्याचे काम केले जात आहे. कळंबोली येथे सुरू असलेला सुमारे ११० मीटर लांबीचा आणि १ हजार ५०० टन वजनाचा फ्लायओव्हर गर्डर रेल्वे वाहतूक खंडित न करता उभारणे हे अभियांत्रिकीच्या दृष्टीने मोठे आव्हान असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

### कॉरिडॉरचे फायदे

- डबल-स्टॅक कंटेनर ट्रेनमधून सुमारे २५० ट्रकइतका माल वाहून नेता येतो.
- विद्युतवर चालणाऱ्या या ट्रेनमुळे पेट्रोल आणि डिझेलची मोठ्या प्रमाणात बचत होईल.
- तसेच, प्रदूषण कमी करण्यासही मदत होईल.
- रस्ते मार्गाने माल पोहोचवण्यासाठी साधारण तीन दिवसांचा कालावधी लागतो.
- मात्र, या कॉरिडॉरद्वारे हेच अंतर अवघ्या १२ तासांत पार करता येईल.

### मालवाहतुकीचा खर्च कमी होणार

भारताला जागतिक सप्लाय चेनचा महत्त्वाचा भाग बनवायचे असेल तर लॉजिस्टिक खर्च कमी करणे आवश्यक आहे. भारतातील लॉजिस्टिक ट्रान्सपोर्ट कॉस्ट पूर्वी सुमारे १४ टक्के होती, तर चीनमध्ये ती सुमारे ७ टक्के होती. गेल्या दशकात भारताने हा खर्च सुमारे १० टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर लॉजिस्टिक खर्च ७ टक्क्यांपेक्षा खाली आणता येईल, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. यामुळे भारत जागतिक सप्लाय चेनचे प्रमुख केंद्र बनण्यास मदत होईल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असेही त्यांनी सांगितले.

### जेएनपीटीनंतर वाढवण बंदरामुळे महाराष्ट्राची ताकद वाढणार

उरण येथील जेएनपीटी बंदर सध्या देशातील कंटेनर वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. देशातील सुमारे ५५ टक्के कंटेनर वाहतूक जेएनपीटीमार्फत होत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. येत्या काळात जेएनपीटीची क्षमता आणखी वाढणार असून, २०२९-३० पर्यंत बंदराची क्षमता एक दशलक्ष TEU पेक्षा अधिक होण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर विकसित होत असलेले वाढवण बंदर जेएनपीटीच्या तुलनेत सुमारे तीनपट मोठे असणार आहे. वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर, जेएनपीटी आणि वाढवण बंदर यामुळे महाराष्ट्राची समुद्री आणि लॉजिस्टिक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून, राज्यात 'मेरिटाइम पॉवर' निर्माण होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. २ हजार ८०० किलोमीटर लांबीची समर्पित मालवाहतूक मार्गिका ही गेल्या १२ वर्षांत देशातील कार्यसंस्कृतीत झालेल्या बदलाची ठोस साक्ष आहे. या समर्पित मालवाहतूक मार्गिकेची संकल्पना २००४ मध्ये मांडण्यात आली होती. या कामासाठी २००६ मध्ये एक विशेष कंपनी स्थापन करण्यात आली. मात्र, २०१४ पर्यंतच्या काळात संबंधित फाईली एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहिल्या. दुर्दैवाने, या फाईलींच्या नशिबीही कोणतीही समर्पित मार्गिका नव्हती. त्या कधी कुठे अडकून पडल्या, तर कधी एखाद्या ठिकाणी पडून राहिल्या आणि अशाच प्रकारे इकडून तिकडे भटकत राहिल्या.

### स्वतंत्र मालवाहतूक मार्गिकेची मुख्य उद्दिष्टे

- सध्याच्या रेल्वेमार्गावरील कोंडी दूर करणे.
- मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांचा सरासरी वेग २५ किमी प्रति तास वरून ७० किमी प्रति तास पर्यंत वाढवणे.
- हेवी हॉल रेल्वेगाड्या चालवणे (२५/३२.५ टन सर्वाधिक एक्सेल भार) आणि एकूण भार १३,००० टन.
- लांब (१.५ km) आणि डबल स्टॅक कंटेनर गाड्या चालवणे.
- वेगवान मालवाहतुकीसाठी सध्याची बंदरे आणि औद्योगिक परिसरांना जोडणे.
- रेल्वेचा हिस्सा सध्याच्या ३०% वरून ४५%. पर्यंत वाढवणे.
- वाहतुकीचा खर्च कमी करणे. ■

# मालगाड्यांसाठी स्वतंत्र महामार्ग... आणि प्रवासी गाड्यांसाठीही नवी जागा!

भारतीय रेल्वेच्या इतिहासात ८ सप्टेंबर २०२६ या तारखेचे एक वेगळे महत्त्व आहे. याच दिवशी भारताचे २ हजार ८४३ किलोमीटरची संपूर्ण स्वतंत्र मालवाहतूक मार्गिका (डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर) कार्यरत झाली. पण हा केवळ मालगाड्यांचा प्रकल्प नाही. त्याचा फायदा आपल्या प्रवासी गाड्यांनाही होऊ शकतो.

**आज** अनेक रेल्वेमार्गांवर प्रवासी गाड्या आणि मालगाड्या एकाच रुळांचा वापर करतात. प्रवासी गाडीला प्राधान्य मिळाले तर मालगाडी थांबते; आणि या दोन्ही प्रकारच्या गाड्यांमुळे व्यस्त मार्गांवरील रेल्वेची क्षमता विभागली जाते. यावर भारताने मोठा उपाय उभा केला – स्वतंत्र मालवाहतूक मार्गिका (डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर) म्हणजे मालवाहतुकीसाठी स्वतंत्र रेल्वेमार्ग.

ईस्टर्न कॉरिडॉर १ हजार ३३७ किमी आणि वेस्टर्न कॉरिडॉर १ हजार ५०६ किमी. मिळून २ हजार ८४३ किमीचे हे संपूर्ण जाळे ८ सप्टेंबर २०२६ रोजी कार्यरत झाले. या मार्गाची रचना ताशी १०० किमीपर्यंत वेगासाठी केली आहे. सुमारे दीड किलोमीटर लांबीची आणि १३ हजार टन माल वाहणारी मालगाडीही त्यावर चालू शकते. वेस्टर्न कॉरिडॉरवर तर एकावर एक दोन कंटेनर असलेल्या दुहेरी थरांच्या कंटेनर रेल्वे गाड्या चालवता येतात.

### याचा उद्योगाला होणारा फायदा समजून घेण्यासाठी एका कारखान्याचे उदाहरण घेऊ

कारखान्याला उद्या कच्चा माल हवा आहे. पण तो उद्या येईल, परवा येईल की त्यानंतर – याची खात्रीच नसेल तर?

कारखाना धोका घेणार नाही. तो जास्त कच्चा माल साठवून ठेवेल. म्हणजे जास्त गोदाम, जास्त खर्च आणि मालाच्या साठ्यात अडकलेला जास्त पैसा. म्हणून पुरवठा साखळीमध्ये माल किती वेगाने येतो याबरोबरच तो सांगितलेल्या वेळेत येण्याची खात्री असणेही महत्त्वाचे आहे. निर्यातीच्या मालासाठी तर वेळ आणखी महत्त्वाची. कंटेनर ठरलेल्या वेळेत बंदरात पोहोचला नाही, तर त्याचे जहाज निघून जाऊ शकते. आणि खूप आधी पोहोचला, तर साठवण व हाताळणीचा खर्च वाढू शकतो.

म्हणूनच वेस्टर्न फ्रेट कॉरिडॉर उत्तर प्रदेशातील दादरी ते मुंबईजवळील जेएनपीटी बंदरापर्यंतचे जोडणे महत्त्वाचे आहे. उत्तर आणि पश्चिम भारतातील औद्योगिक भागांचा माल बंदरापर्यंत अधिक वेगाने आणि अधिक विश्वासार्हपणे पोहोचवण्याची क्षमता त्यामुळे निर्माण झाली आहे.

### पण या सगळ्यात सामान्य रेल्वे प्रवाशाचा फायदा कुठे आहे?

मालगाड्यांचा मोठा भार स्वतंत्र फ्रेट कॉरिडॉरकडे वळल्यामुळे जुन्या, गर्दीच्या रेल्वेमार्गांवरील क्षमता मोकळी होऊ शकते. त्यामुळे प्रवासी गाड्यांना अधिक जागा मिळू शकते आणि भविष्यात काही मार्गांवर अधिक प्रवासी गाड्या चालवण्याची क्षमताही निर्माण होऊ शकते.

म्हणजे या प्रकल्पाची गोष्ट केवळ मालगाडीची नाही – कारखान्याचा कच्चा माल, गोदामातील साठा, निर्यातीचा कंटेनर आणि आपली प्रवासी गाडी या सगळ्यांशी तिचा संबंध आहे. ८ सप्टेंबर २०२६ रोजी पूर्ण झालेल्या या २ हजार ८४३ किलोमीटरच्या मार्गाचे खरे यश आता एका गोष्टीवर ठरेल – भारतात मालाची वाहतूक किती वेगवान होते यावरच नव्हे, तर ती किती विश्वासार्ह आणि वेळेवर होते यावर!

– **संतोष कारखानीस**

# युवा शक्ती आणि डिजिटल क्रांती



स्टार्टअप इंडियापासून ते एआय कौशल्यांपर्यंत पंतप्रधान मोदींनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून युवकांना विकसित भारताचे सर्वात मोठे साधक आणि सर्वात मोठे लाभार्थी म्हणून घोषित केले.

- विकसित भारताच्या प्रवासात युवा वर्ग महत्त्वाची भूमिका बजावतो, देशातील युवा वर्ग हा विकसित भारताचा सर्वात मोठा लाभार्थीसुद्धा आहे.
- युवकांना मोफत प्रशिक्षण दिले जात आहे आणि या उद्देशासाठी एक मोठे जाळे विकसित केले जात आहे.
- स्टार्टअप इंडिया मोहिमेत २५०,००० पेक्षा जास्त स्टार्टअप्सची नोंदणी झाली आहे. भारत सरकारने १ लाख कोटी रूपयांच्या नवोन्मेष निधीची घोषणा केली आहे.
- भारतातील खाजगी स्टार्टअप्समधील तरुणांनी जगातील पहिल्या चाचणी फेरीत त्यांचे उपग्रह आणि रॉकेट आधीच प्रक्षेपित केले आहेत.
- पंतप्रधानांनी घोषणा केली की येत्या वर्षात १० दशलक्ष युवकांना एआय कौशल्यांमध्ये प्रशिक्षित केले जाणार आहे.
- २००४-२०१४ मध्ये ३५० पेक्षा कमी विद्यापीठे होती, आज ६५० नवीन विद्यापीठे सामील झाली असून ही संख्या जवळपास १००० झाली आहे.
- २०१४ पूर्वी ४०० वैद्यकीय महाविद्यालये होती, त्यांची संख्या आता ८५० झाली आहे. परदेशी विद्यापीठेही भारतात येत आहेत.
- मुलांमध्ये नावीन्य आणि तंत्रज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी १०,००० पेक्षा जास्त अटल टिंकरिंग लॅबची स्थापना करण्यात आली.

● २०१४ पूर्वी जैवअर्थव्यवस्थेची उलाढाल ६० हजार कोटी होती, जी आता २० लाख कोटींवर पोहोचली आहे.

● २००९-१० मध्ये १ लाख ५० हजार इलेक्ट्रिक वाहने विकली गेली, तर यावर्षी २५ लाख इलेक्ट्रिक वाहने विकली ठेली.

● 'मेड इन इंडिया' विमानांच्या निर्मितीमध्ये यश मिळाले आहे, 'मेड इन इंडिया' डिफेन्स ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट सी२९५ ने यशस्वी उड्डाण केले आहे.

● ड्रोनद्वारे स्वामित्व हक्क योजना गावांमध्ये यशस्वी ठरत असून, सुमारे सव्वा तीन कोटी कुटुंबांना याचा फायदा होत आहे.

# खेळांमधून घडतो भारत

## अमली पदार्थमुक्त भारत




> २०३६ ऑलिम्पिक आणि २०३० राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेसाठी सज्ज होत असताना अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे पंतप्रधान मोदींचे युवकांना आवाहन...

● जे खेळतात, ते समृद्ध होतात. आता क्रीडा मंचांवर भारताचे राष्ट्रगीत ऐकू येते आहे आणि तिरंगा फडकताना दिसतो आहे.

● भारत टॉप्स योजना, खेलो इंडिया गेम्स, युनिव्हर्सिटी गेम्स, हिवाळी खेळ, बीच गेम्स, क्रीडासंबंधी पायाभूत सुविधा, क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा वैद्यकशास्त्र आणि क्रीडा पोषण अशा सर्व क्षेत्रांमध्ये प्रभुत्व मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

● आम्ही २०३६ ऑलिम्पिकसाठी प्रबळ दावेदार म्हणून उदयास येत आहोत आणि २०३० साली राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेचे आयोजन करणार आहोत.

● २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी आपल्याला खेळाडूंची गरज असेल, तर आजपासूनच ५ ते १५ वयोगटातील मुलांमधील क्रीडा प्रतिभेचा शोध घेण्यासाठी गावांमध्ये आणि शाळांमध्ये प्रतिभा शोध मोहीम राबवली जाईल.

● ऑलिम्पिकमधील सुमारे ३२५-३५० स्पर्धांपैकी दोन-तृतीयांश स्पर्धांमध्ये भारताचा सहभागच नाही. भारत यावर लक्ष केंद्रित करेल आणि यासाठी आम्ही प्रतिभा शोध मोहीम राबवू इच्छितो.

● अमली पदार्थांचे व्यसन ही एक मोठी समस्या बनत आहे. अमली पदार्थमुक्त भारत ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

● देशातील सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना, देशातील आध्यात्मिक नेत्यांनी मिळून अमली पदार्थमुक्त भारतासाठी १०० आठवड्यांचा कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही मोहीम १०० आठवडे चालणार आहे. मी प्रत्येक कुटुंबाला सांगू इच्छितो की त्यांनी या मोहिमेत सहभागी व्हावे.

# नक्षलवादाचा अंत

## मानसिक नक्षलवाद्यांचे नवे आव्हान



# सुरक्षित, सक्षम

## भारताची संरक्षण क्रांती

चार दशकांच्या नक्षलवादाचे निर्मूलन करण्याच्या यशाबरोबरच, मानसिक नक्षलवाद्यांना ओळखून त्यांना वेगळे करण्याचे पंतप्रधान मोदींचे आवाहन...

● नक्षलवाद आणि माओवादाने लाखो तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त केले आहे. चार दशके त्यांनी मोठ्या लोकसंख्येला बंदुकीच्या धाकावर ठेवले होते. सामान्य नागरिकांचे रक्षण करताना ३,५०० पेक्षा जास्त पोलीस आणि सुरक्षा कर्मचारी शहीद झाले.

● २०१४ साली आम्हाला संधी मिळाली आणि आम्ही देशाला नक्षलवादापासून मुक्त करण्याचा संकल्प केला. आज नक्षलवादी आणि माओवादी हिंसेमध्ये शेवटचा श्वास घेण्याचीही ताकद उरलेली नाही.

● जिथे एकेकाळी नक्षलवाद्यांनी गोळ्या झाडल्या गेल्या, जिथली जमीन एकेकाळी रक्ताने माखली होती, त्याच नक्षलवादी भागांमध्ये आज नक्षलमुक्त क्षेत्रामुळे विकास, विश्वास आणि प्रयत्नांचा तिरंगा उंच फडकतो आहे.

● आम्ही जंगलांमधील सशस्त्र नक्षलवाद्यांच्या धोक्यातून देशाला मुक्त करण्यात यशस्वी झालो आहोत. सशस्त्र नक्षलवादी निघून गेले आहेत, पण मानसिक नक्षलवादी संधीची वाट पाहत आहेत.

● ते हिंसाचार आणि अराजकतेला खतपाणी घालण्याचे मार्ग शोधत आहेत. समाजाची दिशाभूल करण्यासाठी ते विविध डावपेचांचा अवलंब करत आहेत. या विचारशून्य नक्षलवाद्यांना ओळखून त्यांना वेगळे पाडले पाहिजे. देशाच्या तरुण पिढीला विकसित राष्ट्र घडवण्याच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट केले पाहिजे.

● या आव्हानाला कमी लेखता कामा नये. आपल्याला या आव्हानाबाबत जास्त सतर्क राहण्याची गरज आहे. अनेक वर्षे, सत्तेच्या वर्तुळात माओवादी विचारसरणीच्या लोकांचे वर्चस्व होते. सरकारी समित्यांवर सल्लागार म्हणून काम करतानाही, या माओवादी विचारसरणीने धोरणांवर प्रभाव टाकला.




युद्धाच्या बदलत्या स्वरूपादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मिशन सुदर्शन चक्र, संरक्षण निर्यात आणि नागरी संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणाची घोषणा केली.

● आज युद्धाचे स्वरूप बदलत आहे. आता युद्ध केवळ सीमेवरच होईल याची शाश्वती राहिलेली नाही. आज युद्धाच्या नव्या स्वरुपाअंतर्गत सीमेच्या आत कुठे रिफायनरी, कुठे बँकिंग क्षेत्र तर कुठे माहितीसाठा केंद्रापर्यंत जात पायाभूत सुविधा आणि कारखाने नष्ट केले जात आहेत.

● लाल किल्ल्यावरून मी घोषणा करत आहे की येत्या काळात आपण नागरी संरक्षणाची एक बहुआयामी व्यवस्था उभी करू. त्यात आधुनिक यंत्रणांचा अंतर्भाव करू.

# ‘युवा’ हाच प्रत्येक निर्णयाचा आधार




आजच्या काळामध्ये देशापुढे आणि जगापुढे असलेली वेगवेगळी आव्हाने पाहता, आपल्यावरही काही वेगळ्या जबाबदाऱ्या आहेत. आपल्या जीवनातील आगामी ३०-३५ वर्षांमध्ये जे काही केले जाणार आहे, ते कार्य युवकांकडून केले जाईल. विकसित भारताच्या प्रवासावर या युवकांचाच मोठा प्रभाव असेल. याच कारणामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आयआयटी दिल्लीच्या दीक्षांत कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना म्हणाले की, आपण घेत असलेल्या प्रत्येक निर्णयाचा आपल्या देशाला नेमका काय लाभ होणार आहे, याचा विचारच त्या निर्णयाचा आधार असला पाहिजे. आज भारत आर्थिक स्वावलंबन, तंत्रज्ञानातील स्वावलंबन, औद्योगिक स्वावलंबन यासाठी कार्यरत आहे. याच भक्कम पायावर एका भव्य आणि विकसित भारताचे करायचे आहे निर्माण.

- संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर असणे अनिवार्य झाले आहे, नेक्स्ट जनरेशन संरक्षण तंत्रज्ञान विकसित करून जागतिक पुरवठादार बनायचे आहे.
- आधुनिक संकटांपासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी काय व्यवस्था असू शकते, यासाठी नागरी संरक्षणाशी संबंधित आधुनिक आव्हानांवर मात करू शकेल, असे स्वेच्छेने आलेल्यांचे एक खूप मोठे दल आपण उभारणार आहोत.
- ड्रोन, ड्रोन प्रतिबंधक यंत्रणा आणि हायपरसॉनिक संरक्षण तंत्रज्ञानामध्ये आघाडी घ्यावी लागेल. सायबर सुरक्षा ही देखील आज घराघरांची समस्या बनू लागली आहे. या क्षेत्रातही युवा वर्गातील क्षमतांचा उपयोग करून घ्यायचा आहे.
- मिशन सुदर्शन चक्राच्या बाबतीत वेगाने काम सुरू आहे. संरक्षण क्षेत्रातील निर्यात जवळपास ५० पटीने वाढली आहे, सुमारे १०० देशांमध्ये आपली शस्त्रास्त्रे पोहोचत आहेत. जागतिक पटलावर भारताचे स्थान हळूहळू वाढते आहे.




विकसित भारताच्या या प्रवासामध्ये युवावर्गाची खूप मोठी महत्वाची भूमिका असणार आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, देशातील युवक जितका जास्त सशक्त होईल, तितकाच देशही सशक्त, मजबूत होईल. हा विचार करून ज्या क्षेत्रांमध्ये युवकांना आधी बंदी असे, अशा अनेक नवीन क्षेत्रांच्या वाटा आता सरकारने मुक्त केल्या आहेत. सरकारच्या आधुनिक धोरणांमुळे आज देशांमध्ये युवकांसाठी नवनवीन क्षेत्रे विकसित होत आहेत.

आयआयटी दिल्लीच्या ५७ व्या दीक्षांत समारंभामध्ये पंतप्रधानांनी गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेच्या सर्वाधिक प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविले. आयआयटी दिल्लीच्या सोनीपत परिसरामध्ये स्थापन केलेल्या एआय सक्षम उच्च –गुणवत्तापूर्ण सुपर कॉम्प्युटिंग सुविधा 'परम प्रज्ञा'चे उद्घाटनही करण्यात आले. या सुपर कॉम्प्युटिंग सुविधेमुळे संस्थेच्या कृत्रिम प्रज्ञा, डेटा विज्ञान, उन्नत कॉम्प्युटिंग आणि आंतरविद्याशाखीय संशोधन क्षमता यामध्ये उल्लेखनीय कार्य करणे शक्य होईल, अशी अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी यांनी मागच्या वेळेस आयआयटी दिल्ली दीक्षांत कार्यक्रमामध्ये आभासी माध्यमातून मार्गदर्शन करताना अंतराळ क्षेत्रामध्ये होत असलेल्या सुधारणांविषयी चर्चा केली होती. त्याचे स्मरण करून सांगितले की, आतापर्यंत या क्षेत्रामध्ये जवळपास संपूर्ण कार्य सरकार करीत होते. परंतु आज त्याच अंतराळ क्षेत्रामध्ये हजारो युवकांसाठी नवनवीन संधींचे आकाश मुक्त झाले आहे. आज आपले युवक 'लॉन्च व्हेईकल' बनवत आहेत. रॉकेट लॉन्च करीत आहेत. ज्या गोष्टी जगातील मोजक्या देशांना करणे शक्य आहे, ती कामगिरी आपल्या देशातील युवक करून दाखवत आहेत. ■

**आयुष्यभर कुतूहल, उत्सुकता कायम असावी, आपल्यामध्ये शिकण्याची उर्मी असावी. एखादी गोष्ट जर कोणताही विचार केल्याशिवाय स्वीकारली जात असेल तर त्याचे परीक्षण करावे. त्यावर प्रश्न उपस्थित केले जावेत. परंतु फक्त प्रश्न विचारून थांबू नका, त्यावर उत्तर शोधण्याचे धाडसही दाखवा. अशा विचारामुळे तुमची वेगळी ओळख तयार होईल.**

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

# दिघी येथे ग्रीनफिल्ड जहाजबांधणी औद्योगिक समूह उभारणीसाठी करार

## माझगाव डॉकची सुमारे २७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार



**रायगड** जिल्ह्यातील दिघी येथे प्रस्तावित ग्रीनफिल्ड जहाजबांधणी औद्योगिक समूहामध्ये प्रमुख जहाजबांधणी केंद्र म्हणून सहभागी होण्यासाठी नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेड (एनशिपएमएल) आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (एमडीएल) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे राज्यात ९० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. याप्रसंगी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे आणि बंदरे व परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, बिझनेस डेव्हलपमेंटचे सरव्यवस्थापक संजयकुमार सिंह, मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते. एमडीएलतर्फे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन जगमोहन, तर एनशिपएमएलतर्फे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप पी. यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

महाराष्ट्रात ग्रीनफिल्ड जहाजबांधणी समूह विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि मुंबई बंदर प्राधिकरण यांनी संयुक्तपणे नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेड (एनशिपएमएल) या विशेष उद्देश कंपनीची स्थापना केली आहे. केंद्र शासनाच्या ग्रीनफिल्ड जहाजबांधणी समूह विकास आराखड्यांतर्गत हा प्रकल्प पुढे नेण्यात येत असून, तो 'मेरीटाईम अमृत काल व्हिजन २०४७'च्या उद्दिष्टांना पूरक ठरणार आहे. या सामंजस्य करारानुसार एमडीएलने दिघी येथे प्रतिवर्ष किमान २ दशलक्ष सकल टनभार (ग्रॉस टनेज) जहाजबांधणी क्षमतेचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी सुमारे २७ हजार कोटी रुपयांची प्रस्तावित गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे मोठ्या व्यावसायिक जहाजांची निर्मिती करणे शक्य होणार असून, देशाच्या सागरी औद्योगिक क्षमतेला बळकटी मिळणार आहे. तसेच प्रत्यक्ष १५ हजार व अप्रत्यक्ष ७५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. दिघी येथील या प्रकल्पामुळे आधुनिक जहाजबांधणी पायाभूत सुविधा तसेच त्यास पूरक औद्योगिक व पुरवठा साखळी परिसंस्था विकसित होणार आहे. देशांतर्गत जहाजबांधणी क्षमता वाढ, तंत्रज्ञान व गुंतवणूक आकर्षित करणे, कुशल रोजगारनिर्मिती आणि जागतिक सागरी क्षेत्रातील भारताची स्पर्धात्मकता वाढविण्यास या प्रकल्पामुळे चालना मिळणार आहे. एमडीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन जगमोहन यांनी या उपक्रम ासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र शासनाने दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. जटिलजहाजबांधणी, अभियांत्रिकी, प्रकल्प व्यवस्थापन आणि सक्षम देशांतर्गत पुरवठादार व्यवस्था विकसित करण्याचा अनुभव एमडीएलकडे आहे. सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने दिघी येथे आधुनिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक जहाजबांधणी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. ■

## ‘महाराष्ट्र लँड बँक’ आणि ‘महाभूमी स्टॅक’ प्रणालीचे लोकार्पण



**महाराष्ट्रातील** पायाभूत विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि महसूल व वन विभागाच्या सेवा सामान्य नागरिकांना ऑनलाईन, सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी ‘महाराष्ट्र लँड बँक’ आणि ‘महाभूमी स्टॅक’ या अत्याधुनिक प्रणालींचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील अनेक प्रकल्प मार्गी लावण्याच्या उद्देशाने दोन्ही विभागाना समन्वय साधण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यावेळी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आणि जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी ‘महाराष्ट्र लँड बँक’ व ‘महाभूमी स्टॅक’ या प्रणालींचे सविस्तर सादरीकरण केले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत’ संकल्पनेनुसार आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या संकल्पनेतून महामार्ग, रेल्वे, बुलेट ट्रेन, विद्युत वाहिन्या यांसारख्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यासाठी महसूल व वन विभागाने संयुक्तपणे जिल्हानिहाय ‘लँड बँक’ तयार केली आहे. कायद्यानुसार वनजमीन वळती करताना पर्यायी वनीकरणासाठी तितकीच वनेतर जमीन किंवा दुप्पट अवनत वनजमीन देणे बंधनकारक असते. योग्य जमिनीच्या शोधात प्रकल्प रखडू नयेत म्हणून राज्यात ३३ हजार ५६ हेक्टर अवनत वनजमीन आणि महसूल विभागाकडील ७ हजार ५४६ हेक्टर वनेतर जमीन अशी मोठी ‘लँड बँक’ डिजिटल पोर्टलवर उपलब्ध करण्यात आली आहे. यामुळे पर्यायी जमिनीचे क्लिअरन्स ऑनलाईन व तात्काळ मिळून मोठे विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे. ■

## खेळाडूंच्या नोकर भरतीचे सुधारित आरक्षण धोरण मंजूर



**राज्यातील** प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबत सुसूत्रता व एकसंधता आणण्यासाठी सुधारित धोरण लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या सुधारित धोरणानुसार आरक्षणासाठी पात्र खेळाडूंना तीन महिन्यांच्या मुदतीत क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. क्रीडा क्षेत्रात जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेसाठी प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबतचे सुधारित धोरण लागू करण्यात येत आहे. हे आरक्षण मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व महानगरपालिका, शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे व विद्यापीठे, शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रम शाळा व सहकारी संस्था (बँका, साखर कारखाने इ.), याशिवाय सहायक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या-ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालयांना राज्य शासनाकडून निधी अथवा अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था, मंडळांच्या आस्थापनेवर गट-अ, ब, क आणि ड मधील सरळसेवेच्या पदांसाठी खेळाडूंना पाच टक्के समांतर आरक्षण लागू राहणार आहे.

ऑलिम्पिक (समर) स्पर्धांमधील २००५ नंतर सलग तीन ऑलिम्पिक गेम्समध्ये समाविष्ट असलेले खेळ आणि स्थानिक खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता कबड्डी, खो-खो, बुद्धीबळ, मल्लखांब व क्रिकेट हे देशी खेळ आरक्षणासाठी पात्र असतील. त्याचबरोबर पात्र खेळांची अट ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक गेम्स, एशियन गेम्स, पॅरालिम्पिक एशियन गेम्स व कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांना लागू राहणार नाही. ■

# सेवा, संकल्प अभियानाचा प्रारंभ








नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मुख्यालयात सेवा, संकल्प अभियानाचा प्रारंभ राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी रक्तदान करून केला. याप्रसंगी माजी खासदार जफर इस्लाम, दिल्ली अध्यक्ष व केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा आदी मान्यवर उपस्थित होते.

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनीही रक्तदान केले.



ज्येष्ठ नेते अतुल शाह यांनी गणेशोत्सव मंडळ कार्यकर्त्यांसाठी तयार केलेल्या प्रथमोपचार कीटचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने हे कीट तयार करण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण आदी.




सावंतवाडी–सिंधुदुर्ग कार्यकारिणी बैठक– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, पालकमंत्री नितेश राणे, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. प्रमोद जठार, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, ज्येष्ठ नेते अजित गोगटे आदी.



रत्नागिरी– दक्षिण जिल्हा कार्यकारिणी बैठक– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, आ. निरंजन डावखरे, आ. प्रमोद जठार, रत्नागिरी दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव, माजी आमदार विनय नातू आदी.




रत्नागिरी– सुभाष सापटे, नगरसेवक शैलेश शिवगण, नगरसेविका समृद्धी शिगवण, नगरसेवक दिनेश सापटे, नगरसेविका राजश्री सापटे, विजय कदम, राजेंद्र निकम, युवराज गुजर, तानाजी पोफळकर, माणीचे सरपंच राकेश शिंदे आदींचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे आदी.







कामगार आघाडी कार्यकारिणी बैठक– उपस्थिती– आघाडी प्रभारी मिलिंद तुळसकर, आघाडीचे प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आघाडीचे माजी अध्यक्ष गणेश ताठे, सरचिटणीस बाळा टेमकर, मिलिंद देशपांडे, अजय दुबे, भाग्यश्री देशमुख, दादा ननवरे, हनुमंत लांडगे आदी.



राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी मुंबई येथील सिद्धीविनायकाचे दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, सिद्धीविनायक ट्रस्टचे खजिनदार पवन त्रिपाठी आदी.



राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, कौशल्य विकास व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई अध्यक्ष अमित साटम, महापौर रितु तावडे आदी.



राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी पुण्याचे ग्रामदैवत व मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपतीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण.



राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी वर्षा निवासस्थानी गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सौ. अमृता फडणवीस.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com